60
YEARS OF
ENLIGHTENMENT
THROUGH EDUCATION

नवीन पाठ्यपुस्तकावर आधारित

# राज्यशास्त्र
# नवनीत

## इयत्ता बारावी

नवनीत मार्गदर्शक म्हणजे → सुनियोजित अभ्यास, उज्ज्वल यश हमखास




NAVNEET®

नवीन अभ्यासक्रम आणि नवीन पाठ्यपुस्तक यांवर आधारित

# राज्यशास्त्र

# नवनीत

## इयत्ता बारावी

कृती आधारित

- **ठळक वैशिष्ट्ये :**

१. प्रत्येक प्रकरणाची अभ्यास-घटकनिहाय रचना.

२. प्रत्येक प्रकरणाच्या सुरुवातीला सर्वसमावेशक 'महत्त्वाचे मुद्दे'.

३. संपूर्ण अभ्यासक्रमाचे व पाठाचे विविध प्रश्नप्रकारांत विभाजन.

४. वस्तुनिष्ठ, लघूत्तरी व दीर्घोत्तरी अशा सर्व प्रकारच्या प्रश्नांची सुबोध भाषेत अचूक, मुद्देसूद व आदर्श उत्तरे.

५. नवीन प्रश्नप्रकारांचा – आपले मत नोंदवा व नकाशा आधारित प्रश्न यांचा – विशेष समावेश.

**नवनीत मार्गदर्शक म्हणजे → सुनियोजित अभ्यास, उज्ज्वल यश हमखास**

: लेखक :

**श्री. नवनीत**

**नवीन आवृत्ती : २०२०**

Balbharati Registration No. 2018MH0014

E0353

NAVNEET

नवनीत एज्युकेशन लिमिटेड

## नवनीत – शैक्षणिक क्षेत्रातील देदीप्यमान यशाची ६० वर्षे!

सन १९५९ मध्ये रुजवलेल्या **नवनीत एज्युकेशन लिमिटेड** या रोपट्याचे आता ६० व्या वर्षी डेरेदार वृक्षात रूपांतर झाले आहे. तब्बल साठ वर्षांच्या या यशस्वी वाटचालीत नवनीतने प्रकाशन आणि स्टेशनरी व्यवसायात भारतातच नव्हे, तर परदेशांतही अढळ स्थान मिळवले आहे. शैक्षणिक पुस्तके, वह्या, स्टेशनरी या पुढे जाऊन काळानुरूप इ-लर्निंग क्षेत्रांमध्येही नवनीतने चांगलाच जम बसवला आहे. 'शैक्षणिक क्षेत्रात योगदान देणारी परिपूर्ण संस्था' हे अभिमानाचे बिरुद मिरवत षष्ठ्यब्दीपूर्तीचा हा सोहळा आनंदाने साजरा करताना आम्ही कृतकृत्य आहोत.

असं म्हणतात की, गुणवत्ता हा अपघात नसून ती बुद्धिमान व्यक्तींच्या प्रयत्नांची फलश्रुती असते. नवनीतच्या गुणवत्तेचे श्रेयही निर्विवादपणे नवनीतच्या संस्थापकांचे आहे. त्यांनी दिलेल्या ध्येयधोरणांशी बांधील राहून, त्यांचा वारसा पुढे चालवण्याचे प्रामाणिक प्रयत्न आम्ही करीत आहोत.

सुजाण आणि दक्ष विद्यार्थी, पालक, शिक्षक, मुख्याध्यापक, शैक्षणिक संस्था आणि शैक्षणिक साहित्य विक्रेते ही आमची खरी ताकद आहे. त्यांच्या गुणवत्तेविषयी आग्रही दृष्टिकोन आम्हांला अतिशय मोलाचा वाटतो. त्यांचे सहकार्य आणि सदिच्छा घेऊनच आम्ही यशाचे अधिक उच्चांक प्रस्थापित करू इच्छितो.

उत्तम गुणवत्तेची खात्री म्हणजे नवनीत, असा नवनीतचा ठसा उमटवण्यात आमच्या ६० वर्षांच्या या प्रदीर्घ वाटचालीत आमचे सर्व हितचिंतक आणि कर्मचारीवृंद या सर्वांचे योगदान अमूल्य आहे. म्हणूनच आम्ही या सर्वांविषयी कृतज्ञता व्यक्त करतो.

– **नवनीत एज्युकेशन लिमिटेड**


NAVNEET®

**नवनीत एज्युकेशन लिमिटेड**

**मुंबई :** नवनीत भवन, भवानीशंकर रोड, दादर (प.), **मुंबई–४०० ०२८.** (फोन : ६६६२ ६५६५)

www.navneet.com ● **e-mail :** publications@navneet.com

**पुणे :** नवनीत भवन, १३०२, शुक्रवार पेठ, बाजीराव रोड, सणस प्लाझाजवळ, **पुणे–४११ ००२.** (फोन : २४४३ १००७)

**नागपूर :** ६३, शिवाजी सायन्स कॉलेजसमोर, काँग्रेसनगर, **नागपूर – ४४० ०१२.** (फोन : २४२ १५२२)

**नाशिक :** निर्माण इन्स्पायर, दुसरा मजला, कान्हेरे वाडी, जुन्या सीबीएसच्या समोर, **नाशिक–४२२ ००१.** (फोन : २५९ ६९५०)



© **All rights reserved. No part of this book may be copied, adapted, abridged or translated, stored in any retrieval system, computer system, photographic or other system or transmitted in any form or by any means without a prior written permission of the copyright holders, M/s. Navneet Education Limited.** ***Any breach will entail legal action and prosecution without further notice.***



**Published by :** Navneet Education Limited, Dantali, Gujarat.
**Printed by :** Navneet Education Limited, Dantali, Gujarat.

2001
CTP
(3-6-2020)

# मनोगत

बोर्डाने निर्धारित केलेला नवीन अभ्यासक्रम आणि त्यावर आधारित नवीन पाठ्यपुस्तक यांचा सखोल अभ्यास करून **राज्यशास्त्र नवनीत : इयत्ता बारावी** हे पुस्तक प्रकाशित करताना आम्हांला आनंद होत आहे.

इयत्ता बारावीच्या अभ्यासक्रमाची पुढील चार विभागांत विभागणी करण्यात आली आहे :

**(१) राजकीय संकल्पना :** जागतिकीकरण, पर्यावरण, दारिद्र्य आणि स्त्री-पुरुष समानता.

**(२) तुलनात्मक शासन आणि राजकारण :** राष्ट्रीय एकात्मता.

**(३) लोकप्रशासन :** सुशासन.

**(४) आंतरराष्ट्रीय संबंध :** १९९१ नंतरचे जग, भारत आणि जग.

राज्यशास्त्राच्या पारंपरिक क्षेत्रांशी हे चार भाग संबंधित असले, तरी लोकप्रशासन हा विभाग नव्याने समाविष्ट करण्यात आला आहे.

या मार्गदर्शकातील प्रत्येक प्रकरणात सुरुवातीला महत्त्वाच्या मुद्द्यांचे स्पष्टीकरण देण्यात आले आहे. त्यावरून त्या त्या प्रकरणात समाविष्ट असलेल्या पाठ्यवस्तूच्या आशयाचे विद्यार्थ्यांना सहज आकलन होईल. अभ्यासाची उजळणी करण्यासाठी सारांशरूपाने देण्यात आलेले महत्त्वाचे मुद्दे विद्यार्थ्यांना खूपच उपयोगी ठरतील.

प्रस्तुत मार्गदर्शकात वस्तुनिष्ठ, लघूत्तरी व दीर्घोत्तरी अशा सर्व प्रकारच्या प्रश्नांचा समावेश केलेला असून, त्यांची सुबोध भाषेत मुद्देसूद, समर्पक व आदर्श उत्तरे देण्यात आली आहेत. पाठ्यपुस्तकात नव्याने समाविष्ट केलेल्या आपले मत नोंदवा व नकाशा आधारित प्रश्न या प्रश्नप्रकारांतील प्रश्न व त्या प्रश्नांची समर्पक उत्तरे यांचा प्रत्येक प्रकरणात समावेश करण्यात आला आहे.

या मार्गदर्शकाच्या अभ्यासाने विद्यार्थ्यांची **'राज्यशास्त्र'** या विषयाची परिपूर्ण तयारी होईल आणि त्यांना बारावीच्या परीक्षेत उज्ज्वल यश मिळेल, असा दृढ विश्वास आम्हांला वाटतो.

या मार्गदर्शकाची उपयुक्तता वाढवण्याच्या दृष्टीने येणाऱ्या सर्व सूचना स्वागतार्ह आहेत.

**– प्रकाशक**

# अनुक्रमणिका


| | | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | १९९१ नंतरचे जग | ... ५ |
| २. | १९९१ नंतरच्या महत्त्वाच्या संकल्पना आणि समस्या : जागतिकीकरण | ... २० |
| ३. | १९९१ नंतरच्या महत्त्वाच्या संकल्पना आणि समस्या : मानवतावादी प्रश्न | ... ३१ |
| ४. | समकालीन भारत : शांतता, स्थैर्य आणि राष्ट्रीय एकात्मतेसमोरील आव्हाने | ... ४४ |
| ५. | समकालीन भारत : सुशासन | ... ५५ |
| ६. | भारत आणि जग | ... ६३ |


NAVNEET ®

# १ १९९१ नंतरचे जग

**अध्ययनघटक :**

- शीतयुद्धाचा शेवट आणि नव्या राष्ट्रांचा उदय
- एकध्रुवीयतेचा उदय
- मानवी हक्क आणि मानवतावादी हस्तक्षेप
- दहशतवाद
- बहुध्रुवीयता
- प्रादेशिकतावाद

## महत्त्वाच्या संकल्पना

**(१) महासत्ता (Super Power) :** महासत्ता म्हणजे ते राष्ट्र/ती राष्ट्रे ज्यांच्याकडे जागतिक घडामोडींवर प्रभाव टाकून आपले हितसंबंध जोपासण्याची क्षमता असते. दुसऱ्या महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय राजकारणात अमेरिका व सोव्हिएट रशिया या महासत्ता होत्या.

**(२) शीतयुद्ध (Cold War) :** दुसऱ्या महायुद्धानंतर महासत्ता म्हणून उदयास आलेल्या अमेरिका व सोव्हिएट रशिया यांच्यातील सत्ता संघर्षाला 'शीतयुद्ध' असे म्हणतात. त्याचे विविध पैलू म्हणजे विचार प्रणालींचा संघर्ष, अर्थव्यवस्थेतील संघर्ष आणि परस्परांच्या धोक्यातून निर्माण झालेले लष्करी गट. शीतयुद्ध म्हणजे प्रत्यक्ष युद्ध नव्हे, तर युद्धाची तयारी असणारी तणावग्रस्त परिस्थिती. सोव्हिएट रशियाच्या विघटनानंतर हे शीतयुद्ध संपुष्टात आले.

**(३) द्विध्रुवीयता :** १९४५ ते १९९१ या कालखंडातील आंतरराष्ट्रीय राजकारणावर अमेरिका आणि सोव्हिएट रशिया यांच्या वर्चस्वामुळे, सत्तेच्या दोन केंद्रात जग विभागले गेले होते. त्या परिस्थितीला 'द्विध्रुवीयता' असे म्हणतात. सोव्हिएट रशियाच्या विघटनानंतर, एका महासत्तेचा लोप होऊन, द्विध्रुवीयता नष्ट झाली.

**(४) वांशिक राष्ट्रवाद :** स्वयंनिर्णयांच्या हक्कांवर आधारित वांशिक राष्ट्रवादाच्या संकल्पनेत बहुराष्ट्रीय राज्यातील अल्पसंख्य घटकांची स्वातंत्र्याची अपेक्षा अभिप्रेत आहे. बिगररशियन अल्पसंख्यांकांच्या स्वातंत्र्याच्या मागणीतून सोव्हिएट रशियाचे विघटन घडून आले. चेकोस्लोव्हाकिया आणि युगोस्लाव्हिया हे देश खंडित झाले.

**(५) नवीन जागतिक व्यवस्था (New World Order) :** १९९१ साली सोव्हिएट रशियाचे विघटन झाल्यानंतर अमेरिकेच्या वर्चस्वाला आणि नेतृत्वाला मिळालेली जागतिक मान्यता.

**(६) एकध्रुवीय व्यवस्था (Uni-Polar Order) :** सोव्हिएट रशिया या महासत्तेच्या अस्तानंतर अमेरिका जगातील एकमेव महासत्ता बनली. या जागतिक परिस्थितीस 'एकध्रुवीय व्यवस्था' असे म्हणतात.

**(७) इतिहासाचा अंत (End of History) :** फ्रान्सिस फुकुयामा यांनी 'इतिहासाचा अंत' हा सिद्धांत मांडला. त्यांच्या मते, सोव्हिएट रशियामधील साम्यवादाचा पाडाव झाल्यानंतर जगभरात उदारमतवादी लोकशाही व्यवस्था निर्माण होईल.

**(८) उदारमतवादी लोकशाही (Liberal Democracy) :** उदारमतवादी लोकशाही या राजकीय विचारप्रणालीचा केंद्रबिंदू व्यक्तिस्वातंत्र्य आहे. सार्वत्रिक मताधिकार, स्वतंत्र आणि न्याय्य निवडणुका, स्पर्धात्मक पक्षीय राजकारण आणि कायद्याचे राज्य ही त्याची वैशिष्ट्ये आहेत.

**(९) सॉफ्ट पॉवर (Soft Power) :** अमेरिकन समाजशास्त्रज्ञ जोसेफ नाय या द्वारा प्रतिपादित या संकल्पनेचा अर्थ स्वतःला हवे ते दुसऱ्यांना हवेसे वाटणे. सक्तीपेक्षा आकर्षण निर्माण करून स्वतःची उद्दिष्टे साध्य करण्याची क्षमता.

**(१०) हार्ड पॉवर (Hard Power) :** अमेरिकन समाजशास्त्रज्ञ जोसेफ नाय या द्वारा प्रतिपादित या संकल्पनेचा अर्थ दुसऱ्याला स्वतःच्या प्राधान्यक्रम आणि इच्छेविरुद्ध वागण्यास भाग पाडण्याची क्षमता. म्हणजेच धाकदपटशा आणि प्रलोभने दाखवून दुसऱ्यांवर सक्ती करणे.

**(११) मानवतावादी हस्तक्षेप (Humanitarian Intervention) :** मानवाधिकार विषयीची वाढती जागरुकता आणि आंतरराष्ट्रीय कायद्याचे पाठबळ यांच्या आधारे युद्धग्रस्त क्षेत्रात युद्ध थांबवणे, भविष्यकालीन युद्धास प्रतिबंध करणे, शांतता प्रस्थापित करणे आणि युद्धग्रस्त क्षेत्रातील लोकांच्या हक्कांच्या जोपासनेसाठी १९९० च्या दशकात संयुक्त राष्ट्रांनी केलेल्या उपाययोजनांना 'मानवतावादी हस्तक्षेप' असे म्हणतात.

**(१२) शांतता रक्षक दल (Peace Keeping Force) :** संयुक्त राष्ट्रांचे स्वतःचे सैन्य नसते. जागतिक शांतता व सुरक्षितता प्रस्थापित करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांच्या सदस्य देशांच्या सैन्यातून शांतिसेनेची स्थापना केली आहे. या सेनेला 'संयुक्त राष्ट्र शांतता रक्षक दल' असे म्हणतात.

**(१३) दहशतवाद (Terrorism) :** राजकीय, आर्थिक व धार्मिक उद्‌दिष्टे साध्य करण्यासाठी समाजात भीतीचे वातावरण निर्माण करणे, हिंसाचार करणे किंवा हिंसाचाराचा धाक दाखवणे या संघटित गटांकडून केल्या जाणाऱ्या कृतीस 'दहशतवाद' असे म्हणतात.

**(१४) व्यापारी गट (Trade Groups) :** आपले आर्थिक हितसंबंध दृढ करण्याकरिता अनेक देश विशेष करार करून व्यापारी गट स्थापन करतात. सामान्यतः व्यापारातील जकात (आयातीवरील कर) आणि कोटा (आयातीच्या प्रमाणावर घातलेल्या मर्यादा) हे व्यापारातील प्रमुख अडथळे कमी अथवा दूर करण्यासाठी हे करार केले जातात.

**(१५) प्रादेशिक संघटन (Regional Organizations) :** समान आर्थिक/राजकीय हितसंबंध जोपासण्यासाठी विशिष्ट प्रदेशातील देश एकत्र येतात आणि आपले संघटन स्थापन करतात. शीतयुद्धाच्या काळात आशिया व आफ्रिका खंडातील प्रादेशिक संघटन राजकीय उद्‌दिष्टाने तर युरोपात लष्करी गट संरक्षणाच्या उद्देशाने अस्तित्वात आले. शीतयुद्धोत्तर काळातील व्यापारवाढीच्या उद्देशाने प्रादेशिक संघटन अस्तित्वात आले.

**(१६) बहुध्रुवीयता (Multi-polar System) :** अमेरिकेच्या प्रभुत्वास एकविसाव्या शतकात आव्हान मिळाले आहे. युरोपीय समुदाय, चीन आणि जपान, भारत आणि रशिया ही नवीन सत्ताकेंद्रे आहेत. याचाच अर्थ एक/दोन पेक्षा अधिक सामर्थ्यशाली देश किंवा त्यांचे गट असलेल्या जागतिक व्यवस्थेला 'बहुध्रुवीयता' असे म्हणतात.

**(१७) युरो :** १ जानेवारी १९९९ साली जगातील चलनांच्या बाजारात युरोचा प्रवेश झाला; ब्रिटन, स्वीडन आणि डेन्मार्क यांचा अपवाद वगळता युरोपीय संघाच्या सगळ्या देशांमध्ये युरोचा वापर सुरू झाला. युरोपीय संघातील युरो हे राष्ट्रीय चलन म्हणून स्वीकारलेल्या देशांच्या भौगोलिक आणि आर्थिक प्रदेशास युरोझोन म्हणून संबोधतात.

## महत्त्वाचे मुद्दे

### १.० प्रास्ताविक :

(१) नोव्हेंबर १९८९ मध्ये बर्लिनची भिंत पडली आणि सोव्हिएट रशियाच्या विघटनाची सुरुवात होऊन, १९९१ साली शीतयुद्ध, म्हणजेच अमेरिका व सोव्हिएट रशिया यांच्यातील जागतिक वर्चस्वाची लढाई समाप्त झाली.

(२) शीतयुद्धोत्तर कालखंडातील घडामोडींचा आढावा पुढील पाच परिमाणांद्वारा घेता येईल :

(अ) शीतयुद्धाचा शेवट आणि नव्या राष्ट्रांचा उदय

(ब) एकध्रुवीयतेचा उदय

(क) मानवी हक्क आणि मानवतावादी हस्तक्षेप

(ड) दहशतवाद

(ई) बहुध्रुवीयता आणि प्रादेशिकतावाद.

**माहीत आहे का तुम्हांला ?**


महासत्तेला आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये महत्त्वाचे स्थान असते. महासत्तांकडे जागतिक घडामोडींवर प्रभाव टाकून आपले हित साधण्याची क्षमता असते. दुसऱ्या महायुद्धानंतर शीतयुद्धाच्या काळात अमेरिका आणि सोव्हिएट रशिया या दोन महासत्ता एकमेकांसमोर उभ्या ठाकल्या होत्या.

### १.१ शीतयुद्धाचा शेवट आणि नव्या राष्ट्रांचा उदय :

(१) नोव्हेंबर १९८९ मध्ये बर्लिनची भिंत पडली आणि सोव्हिएट रशियाच्या विघटनाची सुरुवात होऊन अखेरीस शीतयुद्धाचा काळ समाप्त झाला. अशा प्रकारे अमेरिका आणि सोव्हिएट रशिया यांच्यामधील वर्चस्वाच्या लढाईवर आधारित पूर्व-पश्चिम वादही यामुळे संपुष्टात आले.


(२) १९८९ नंतर जन्माला आलेली पूर्व युरोपीय राज्यांमधील क्रांती ही तेथील मध्यमवर्गाच्या वाढत्या अपेक्षांमधून निर्माण झाली होती. अधिक स्वातंत्र्य आणि आर्थिक स्थैर्य मिळावे या उद्देशाने सोव्हिएटप्रणीत साम्यवादी शासनांविरुद्ध त्यांनी उठाव केला. तेथे स्वतंत्र लोकशाही राज्ये उदयास आली.

(३) १९८९ नंतर सोव्हिएट रशियाच्या अंतर्गत राजकीय आणि आर्थिक स्वातंत्र्य मिळवण्यासाठीदेखील चळवळी उदयास आल्या. त्यामुळे वेगवेगळ्या राज्यांनी अधिक स्वायत्ततेसाठी आग्रह धरून कालांतराने स्वातंत्र्याची मागणी केली. १९९१ साली सोव्हिएट रशियाचे विघटन होऊन आर्मेनिया, मॉल्डोव्हा, एस्टोनिया, लाटव्हिया, लिथूआनिया, जॉर्जिया, अझरबैजान, ताजिकिस्तान, किरगिझस्तान, बेलारुस, उझबेकिस्तान, तुर्कमेनिस्तान, युक्रेन, कझाकस्तान आणि रशिया ही नवीन राष्ट्रे उदयास आली.



सोव्हिएट रशियाच्या विघटनानंतर उदयास आलेली राज्य

(४) याच कालखंडात युरोपात लोकसमूहांच्या वांशिक अस्मिता प्रबळ होऊ लागल्या होत्या. यामुळे वांशिक अस्मितेवर आधारित स्वतंत्र राष्ट्र निर्मितीच्या मागण्या होऊ लागल्या. चेकोस्लोव्हाकियाचे 'चेक गणराज्य' आणि 'स्लाव गणराज्य' या दोन राष्ट्रांमध्ये विभाजन झाले. युगोस्लाव्हियाचे विघटन होऊन क्रोएशिया, स्लोवेनिया, सर्बिया, बोस्निया आणि हर्झेगोविना, उत्तर मेसिडोनिया, माँटिनिग्रो ही राष्ट्रे उदयास आली.




(५) जगाच्या इतर भागातही वांशिक राष्ट्रवादाचा प्रसार झाला आणि स्वशासनाच्या हक्कावर आधारित काही स्वतंत्र राष्ट्रे उदयास आली. इंडोनेशियापासून पूर्व तिमोर इथियोपियापासून एरिट्रिया आणि सुदानपासून दक्षिण सुदान ही नवीन राष्ट्रे उदयास आली.

(६) वांशिक राष्ट्रवादावर आधारित स्वातंत्र्याच्या मागणीसाठी स्पेनमधील कॅटलोनिया, सर्बियामधील कोसावो आणि रशियामध्ये चेचन्या यांचा स्वातंत्र्य लढा चालू आहे.

## १.२ एकध्रुवीयतेचा उदय :

अमेरिका आणि सोव्हिएट रशिया यांच्यामधील शीतयुद्ध संपल्याने द्विध्रुवीयता संपुष्टात आली. पुढे अमेरिकेचे वर्चस्व असलेली एकध्रुवीय आंतरराष्ट्रीय व्यवस्था उदयास आली.

(१) १९९० मध्ये इराकने कुवेतवर आक्रमण केले. इराक विरुद्धच्या कारवाईत पुढाकार घेत अमेरिकेने एका बहुराष्ट्रीय सैन्याचे नेतृत्व केले. या युद्धात इराकचा पराभव झाला. अमेरिकेच्या या कृतीला जागतिक पातळीवर पाठिंबा मिळाला. या जागतिक परिस्थितीचे वर्णन 'New World Order' असे करण्यात आले.

(२) अंतर्गत समस्येने ग्रस्त सोव्हिएट रशियाचे १९९१ मध्ये विघटन झाले. त्यामुळे अमेरिकेस वैचारिक विरोध करणारी सोव्हिएट रशिया ही महासत्ता संपुष्टात आली. त्यानंतर अमेरिकेच्या वर्चस्वाखालील एकध्रुवीय व्यवस्था उदयास आली.

(३) अमेरिकेच्या या वर्चस्वाला राजकीय आणि आर्थिक आयाम होते. राजकीयदृष्ट्या, पूर्व युरोपातील अनेक पूर्वाश्रमीच्या साम्यवादी राजवटींनी उदारमतवादी–लोकशाही शासनप्रणाली स्वीकारली. बऱ्याच देशांनी समाजवादी अर्थव्यवस्थेचा त्याग करून भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

अमेरिकन राजकीय भाष्यकार फ्रान्सिस फुकुयामा यांनी 'इतिहासाचा अंत' हा सिद्धांत मांडला. त्यांच्या मते, सोव्हिएट रशियामध्ये साम्यवादाचा पाडाव झाल्यानंतर समाजवादी राजकीय, आर्थिक आणि सामाजिक व्यवस्थांचा अंत होऊन आता जगभरात उदारमतवादी लोकशाही व्यवस्था निर्माण होतील.

उदारमतवादी लोकशाही हा प्रातिनिधिक लोकशाहीचाच एक प्रकार आहे. जागतिक स्तरावर आज उदारमतवादी लोकशाही व्यवस्था ही एक प्रबळ राजकीय विचारधारा आहे. यात वैयक्तिक स्वातंत्र्याला महत्त्वाचे स्थान आहे. उदारमतवादी लोकशाहीची काही ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे :

- सार्वत्रिक मताधिकार
- स्वतंत्र आणि न्याय्य निवडणुका
- स्पर्धात्मक पक्षीय राजकारण
- कायद्याचे राज्य

**माहीत आहे का तुम्हांला ?**

अमेरिकन समाजशास्त्रज्ञ जोसेफ नाय यांनी सत्तेचे विभाजन दोन प्रकारांत केले आहे–हार्ड पॉवर आणि सॉफ्ट पॉवर. हार्ड पॉवर म्हणजे ''अशी क्षमता जी दुसऱ्यांना त्यांच्या प्राधान्य-क्रमाच्या आणि इच्छेच्या विरुद्ध वागण्यास भाग पाडते.'' यात धमकी आणि प्रलोभने दाखवून दुसऱ्यांवर सक्ती करणे याचा समावेश होतो. याविरुद्ध सॉफ्ट पॉवर म्हणजे ''अशी क्षमता ज्यामुळे तुम्हांला हवे तेच दुसऱ्यांना हवेसे वाटेल.'' अधिक स्पष्ट करायचे असल्यास, 'सक्तीपेक्षा आकर्षण निर्माण करून स्वतःची ध्येये साध्य करण्याची क्षमता' म्हणजे सॉफ्ट पॉवर होय.

## १.३ मानवी हक्क आणि मानवतावादी हस्तक्षेप :

(१) राष्ट्रांचे विघटन आणि त्या राष्ट्रांचा उदय या प्रक्रियेस मोठ्या प्रमाणात वांशिक हिंसाचार घडून येतो, मानवी हक्कांची पायमल्ली होते. मानवी हक्कांच्या जोपासनेसाठी संयुक्त राष्ट्रांद्वारा केल्या जाणाऱ्या हस्तक्षेपास मानवतावादी हस्तक्षेप असे म्हणतात.

(२) या हस्तक्षेपाचा उद्देश केवळ चालू असलेले युद्ध थांबणे इतका मर्यादित नाही, तर भविष्यकालीन संभाव्य युद्धाला आळा घालणे, शांतता प्रस्थापित करणे आणि युद्धग्रस्त क्षेत्रांतील पीडितांच्या मानवी हक्कांचे रक्षण करणे हा आहे.

(३) कंबोडिया, सोमालिया आणि युगोस्लाव्हिया या राष्ट्रांत संयुक्त राष्ट्रांनी मानवतावादी हस्तक्षेप केला आहे.

(४) मानवी हक्कांबाबत वाटत असलेली जागरुकता आणि आंतरराष्ट्रीय कायद्याचे पाठबळ यांमुळे 'मानवतावादी हस्तक्षेप' या हक्क संरक्षणाच्या नवीन संकल्पनेचा उदय झाला आहे. १९९० चे दशक हे मानवतावादी हस्तक्षेपाचा सुवर्णकाळ होता.

(५) १९९० च्या दशकात संयुक्त राष्ट्रांच्या शांतीसेनेने कंबोडिया, सोमालिया आणि युगोस्लाव्हिया या युद्धग्रस्त क्षेत्रांत शांतता प्रस्थापित करण्याचे कार्य केले.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

शीतयुद्धोत्तर काळातील मानवी हक्क : १९९० पासून अनेक देशांनी मानवी हक्कांसंदर्भातील सहा मुख्य conventions आणि करारांना मंजुरी दिली. १७० हून अधिक देशांनी व्हिएन्ना येथे पार पडलेल्या १९९३ च्या जागतिक मानवी हक्क परिषदेत सहभाग नोंदवला. या परिषदेत त्यांनी मानवी हक्क संरक्षणाबाबत आपल्या जबाबदारीची पुन्हा एकदा पुष्टी केली.

यानंतर संयुक्त राष्ट्रांचे मानवाधिकार उच्चायुक्तांचे कार्यालय अस्तित्वात आले. त्यांचे मुख्य कार्य संयुक्त राष्ट्रांच्या मानवी हक्कांशी निगडित कार्यक्रमांमध्ये समन्वय साधणे व मानवी हक्कांप्रती सार्वत्रिक आदर प्रस्थापित करणे होय.

नव्वदीच्या दशकात मानवी हक्कांसंबंधीचे विचार प्रसारित करण्यात बिगर-सरकारी संस्थांनी महत्त्वाची भूमिका बजावली. इंटरनॅशनल कमिटी ऑफ द रेड क्रॉस, मेडिसीन्स सान्स फ्रंटीयर आणि ऑक्सफॅम या संस्था थेट युद्धक्षेत्रांमध्ये कार्यरत आहेत. या संस्था मानवी हक्कांबाबत मोहीम राबवून मानवी हक्क करार, मानवतावादी कायद्याचे पालन यांचा प्रसार करतात.

## १.४ दहशतवाद :

(१) समाजात भीतीचे वातावरण निर्माण करून राजकीय, धार्मिक आणि वैचारिक उद्दिष्टे पूर्ण करण्याच्या हेतूने चालवलेला हिंसाचार किंवा निर्माण केलेला धाक म्हणजे दहशतवाद होय. सरकारी संस्था आणि अधिकारी यांना त्यात लक्ष्य केले जाते.

(२) १९७२ मध्ये म्युनिक येथे इस्राएलच्या ऑलम्पिक संघावर पॅलेस्टिनी दहशतवाद्यांनी केलेला हल्ला आधुनिक दहशतवादाचे पहिले उदाहरण होते.

(३) त्यानंतरच्या काळात दहशतवादी संघटना विमान अपहरणे, बॉम्बस्फोट आणि राजकीय नेत्यांची हत्या अशा मार्गांचा वापर करू लागले.

(४) पारंपरिक दहशतवादी विशिष्ट लोक समूहांच्या हक्कांसाठी लढणाऱ्या फुटिरतावादी संघटनेत सहभागी होत असत.

(५) ११ सप्टेंबर २००१ रोजी अल-कायदा या संघटनेने घडवून आणलेल्या दहशतवादी हल्ल्याचे प्रत्युत्तर म्हणून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉर्ज डब्ल्यू बुश यांनी 'दहशतवादविरोधी लढाई' ही लष्करी मोहीम आखली. त्या अंतर्गत २००१ साली अफगाणिस्तान युद्ध आणि २००३ साली इराक युद्ध झाले. हे याच लढाईचा भाग होते.

(६) ११ सप्टेंबर २००१ ला अमेरिकेविरुद्ध झालेल्या हल्ल्यानंतर दहशतवादाचे स्वरूप बदलत गेले. आज दहशतवादी विशिष्ट भौगोलिक क्षेत्रातील विशिष्ट लोकसमूहांसाठी लढत नाहीत. दहशतवादी संघटना अमूर्त स्वरूपाच्या धार्मिक विचारसरणीने प्रेरित झालेल्या असतात, त्यांचा लढा अमूर्त स्वरूपाची धार्मिक ध्येये साध्य करण्यासाठी असतो. त्यासाठी वैश्विक पातळीवर योजना राबवल्या जातात. ९/११ च्या हल्ल्यानंतर त्याच्याशी साधर्म्य असलेले हल्ले बाली (२००२), माद्रिद (२००४), लंडन (२००५) आणि मुंबई (२००८) मध्ये घडवून आणले गेले.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

अल-कायदा या संघटनेने घडवून आणलेल्या ९/११ च्या दहशतवादी हल्ल्याचे प्रत्युत्तर म्हणून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉर्ज डब्ल्यू बुश यांनी 'दहशतवादविरोधी लढाई' ही लष्करी मोहीम आखली. अफगाणिस्तान युद्ध (२००१) आणि इराक युद्ध (२००३) हे याच लढाईचा भाग होते. अमेरिका पुरस्कृत या सैनिकी आक्रमणाला ब्रिटन, तुर्कस्थान, जर्मनी, इटली, नेदरलँड, फ्रांस आणि पोलंड या देशांनी पाठिंबा दिला होता.

## १.५ बहुध्रुवीयता :

(१) अलीकडच्या काळात अमेरिकेच्या जागतिक व्यवस्थेवरील वर्चस्वास प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे आव्हान दिले गेले. युरोपियन युनियनच्या माध्यमातून युरोपात आर्थिक आणि प्रादेशिक एकत्रीकरण झाले. चीन, जपान व भारताचा जागतिक अर्थव्यवस्थेवर प्रभाव वाढला आहे. लष्करी शक्ती म्हणून रशियाचे पुनरुत्थान झाले आहे. नव्या प्रादेशिक संघटनांच्या वाढत्या महत्त्वामुळे एकध्रुवीय जागतिक व्यवस्थेचे बहुध्रुवीय व्यवस्थेत रूपांतर झाले आहे.

(२) १९७० च्या मध्यात डेंग शाओपिंग यांच्या नेतृत्वाखाली चीनने उदारीकरणाचे धोरण स्वीकारले. त्यानंतरच्या काळात आर्थिक प्रगती साध्य केली आणि अमेरिकेच्या वर्चस्वास आव्हान उभे केले. चीनने One Belt One Road, चीन–पाकिस्तान आर्थिक कॉरिडोर या प्रकल्पांद्वारा आपले प्रभावक्षेत्र निर्माण केले. आपले नौदल व वायुदल सामर्थ्यशाली करून दक्षिण चिनी सागरावर आपला हक्क प्रस्थापित केला.

(३) खनिज तेल व नैसर्गिक वायू क्षेत्रात प्रगती करून रशिया ऊर्जास्त्रोताची महासत्ता म्हणून उदयास आली. शांघाय कोऑपरेशन ऑर्गनायझेशनच्या माध्यमाद्वारा मध्य आणि पूर्व युरोपात आपला प्रभाव कायम राखला.

(४) इंडो-पॅसिफिक क्षेत्राचे महत्त्व वाढीस लागले आहे.


**व्यापारी गट म्हणजे काय ?**

अनेक देश मिळून आपले आर्थिक हितसंबंध दृढ करण्याकरिता काही विशेष करार करण्यासाठी व्यापारी गट स्थापन करतात. सामान्यतः हे करार व्यापारातील अडथळे कमी अथवा दूर करण्यासाठी केले जातात. जकात (आयातीवरील कर) आणि कोटा (आयातीच्या प्रमाणावर घातलेल्या मर्यादा) हे व्यापारातील अडथळ्यांचे प्रमुख प्रकार आहेत.

## १.६ शीतयुद्धोत्तर काळातील प्रादेशिकवाद :

(१) दुसऱ्या महायुद्धानंतर आशिया व आफ्रिका खंडातील प्रादेशिकवादाचा आशय राजकीय होता; तर युरोपात आर्थिक समन्वयावर भर देण्यात आला.

(२) १९६० च्या दशकात आर्थिक निकषावर आधारित ASEAN सारख्या प्रादेशिक संघटना उदयास आल्या. या संघटनांनी व्यापारवृद्धी कडेही लक्ष दिले. त्यामुळे अनेक व्यापारी गट निर्माण झाले.




(३) **युरोपीय संघ (European Union)** युरोपीय देशांत आर्थिक सहकार्य वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने विकसित झालेले एक प्रादेशिक संघटन आहे. १९७३ मध्ये युरोपीय संसदेची, १९८० च्या दशकात युरोपीय बाजारपेठेची आणि १९९२ साली मास्त्रीक्त कराराद्वारा युरोपीय संघाची स्थापना झाली. आर्थिक पातळीवर एकीकरण होऊन 'युरो' या समान चलनाचा उदय झाला.

**माहीत आहे का तुम्हांला?**

१ जानेवारी १९९९ साली जगातील चलनांच्या बाजारात युरोचा प्रवेश झाला; ब्रिटन, स्वीडन आणि डेन्मार्क यांचा अपवाद वगळता युरोपीय संघाच्या सगळ्या देशांमध्ये युरोचा वापर सुरू झाला. युरोपीय संघातील युरो हे राष्ट्रीय चलन म्हणून स्वीकारलेल्या देशांच्या भौगोलिक आणि आर्थिक प्रदेशात युरोझोन म्हणून संबोधतात.

२०२० साली २८ राष्ट्रांच्या युरोपीय संघातून युनायटेड किंग्डम हा देश बाहेर पडला. हवामानबदल, पर्यावरण, संवर्धन, आरोग्य, स्थलांतर व सुरक्षा इत्यादी क्षेत्रात ही संघटना कार्यरत आहे. संघटनेतील राष्ट्रांत मुक्त प्रवास करण्याची परवानगी देणाऱ्या शेंगेन व्हिसाची निर्मिती करण्यात आली.

**माहीत आहे का तुम्हांला?**

**शेंगेन व्हिसा म्हणजे काय?**

शेंगेन व्हिसा पात्र व्यक्तींना २६ सहभागी देशांमध्ये मुक्तपणे प्रवास करण्याची परवानगी देतो. याचाच अर्थ युरोपीय प्रवाशांना अंतर्गत शेंगेन सीमांवर तपासणी प्रक्रियांना सामोरे न जाता वेगवेगळ्या शेंगेन देशांमध्ये थेट प्रवेश मिळवता येईल.

युरोपीय संघाचे कामकाज पाहण्यासाठी युरोपीय संसद, परिषद, आयोग व न्यायालयाची स्थापना करण्यात आली.

(४) दक्षिण आशियाई राष्ट्रांचे प्रादेशिक संघटन असलेल्या SAARC ची स्थापना १९८५ साली करण्यात आली.

(५) **बीम्सटेक (BIMSTEC)** ही बंगालच्या उपसागरालगतच्या देशांची संघटना १९९७ साली स्थापन करण्यात आली.

(६) **ब्रिक्स (BRICS)** संघटनेची स्थापना २००९ साली ब्राझील, रशिया, भारत आणि चीन या राष्ट्रांनी केली. २०१० साली दक्षिण आफ्रिका या संघटनेत सामील झाला.

(७) **शांघाय सहकार्य संघटन**ची स्थापना सन २००१ मध्ये करण्यात आली.

(८) G-20 नावाने आंतरराष्ट्रीय व्यासपीठ १९९९ मध्ये स्थापन करण्यात आले. युरोपियन युनियन आणि १९ अन्य देशांचे हे संघटन आहे.

## प्रश्नोत्तरे

**प्र. १ दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा : *(प्रत्येकी १ गुण)***

**[ १ ]**

*(१) १९८९ नंतर आंतरराष्ट्रीय संबंधांमधील महत्त्वाचा प्रवाह – --------
*(अ) द्विध्रुवीयतेचा अस्त*
*(ब) आशियामध्ये प्रादेशिकतावादाचा उदय*
*(क) अलिप्ततावादाचा अंत*
*(ड) नवीन आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्थेची मागणी*

*(२) मास्त्रीक्त करार संदर्भ – --------
*(अ) संयुक्त राष्ट्र शांतता रक्षक दल*
*(ब) युरोपीय संघ*
*(क) अमेरिकेचा कुवेतमध्ये हस्तक्षेप*
*(ड) ब्रिक्सची स्थापना*

(३) -------- वर्चस्व असलेली एकध्रुवीय आंतरराष्ट्रीय व्यवस्था १९८९ नंतर उदयास आली.
*(अ) अमेरिकेचे (ब) रशियाचे (क) चीनचे (ड) इंग्लंडचे*

(४) नोव्हेंबर १९८९ मधील -------- या घटनेनंतर सोव्हिएट रशियाच्या विघटनाची सुरुवात झाली.
*(अ) युगोस्लाव्हियातील यादवीयुद्ध*
*(ब) अरब – इस्राईल संघर्ष*
*(क) इराकचे कुवेतवर आक्रमण*
*(ड) बर्लिनची भिंत पडणे*

(५) सोव्हिएट युनियनच्या विघटनानंतर -------- यांच्या नेतृत्वाखाली रशियाचा उदय झाला.
*(अ) गॉर्बाचेव्ह (ब) याल्स्तीन (क) पुतिन (ड) ब्रेझनेव्ह*

**उत्तरे :**

(१) १९८९ नंतर आंतरराष्ट्रीय संबंधांमधील महत्त्वाचा प्रवाह – द्विध्रुवीयतेचा अस्त.

(२) मास्त्रीक्त करार संदर्भ – युरोपीय संघ.

(३) अमेरिकेचे वर्चस्व असलेली एकध्रुवीय आंतरराष्ट्रीय व्यवस्था १९८९ नंतर उदयास आली.

(४) नोव्हेंबर १९८९ मधील बर्लिनची भिंत पडणे या घटनेनंतर सोव्हिएट रशियाच्या विघटनाची सुरुवात झाली.

(५) सोव्हिएट युनियनच्या विघटनानंतर पुतिन यांच्या नेतृत्वाखाली रशियाचा उदय झाला.

**[ २ ]**

(१) कॅटलीनियाला --------पासून स्वातंत्र्य हवे आहे.
*(अ) फ्रान्स (ब) स्पेन (क) इटली (ड) जर्मनी*

(२) पूर्व युरोपातील अनेक पूर्वाश्रमीच्या साम्यवादी राष्ट्रांनी अमेरिकी -------- तत्त्वांवर आधारलेली शासनप्रणाली स्वीकारली.
*(अ) अध्यक्षीय लोकशाही (ब) संघराज्य व्यवस्था*
*(क) प्रजासत्ताक व्यवस्था (ड) उदारमतवादी लोकशाही*

(३) शैक्षणिक देवाण-घेवाण, आंतरजाल व फूड चेन्स ही अमेरिकेच्या -------- काही उदाहरणे आहेत.
*(अ) हार्ड पॉवरची (ब) सॉफ्ट पॉवरची*
*(क) महासत्ता असल्याची (ड) जागतिक वर्चस्वाची*

(४) -------- हे संयुक्त राष्ट्राच्या प्रमुख कार्यामधील एक कार्य आहे.
*(अ) अण्वस्त्र प्रतिबंध (ब) शांतता रक्षण*
*(क) युद्ध समाप्ती (ड) न्यायनिवाडा*

(५) -------- कंबोडिया, सोमालिया आणि युगोस्लाव्हिया या देशांमध्ये हस्तक्षेप केला.
*(अ) संयुक्त राष्ट्रांनी (ब) अमेरिकेने*
*(क) चीनने (ड) भारताने*

**उत्तरे :**

(१) कॅटलीनियाला स्पेनपासून स्वातंत्र्य हवे आहे.

(२) पूर्व युरोपातील अनेक पूर्वाश्रमीच्या साम्यवादी राष्ट्रांनी अमेरिकी उदारमतवादी लोकशाही तत्त्वांवर आधारलेली शासनप्रणाली स्वीकारली.

(३) शैक्षणिक देवाण-घेवाण, आंतरजाल व फूड चेन्स ही अमेरिकेच्या सॉफ्ट पॉवरची काही उदाहरणे आहेत.

(४) शांतता रक्षण हे संयुक्त राष्ट्राच्या प्रमुख कार्यामधील एक कार्य आहे.

(५) संयुक्त राष्ट्रांनी कंबोडिया, सोमालिया आणि युगोस्लाव्हिया या देशांमध्ये हस्तक्षेप केला.

**[ ३ ]**

(१) वांशिक राष्ट्रवादाची संकल्पना -------- या तत्त्वावर आधारित आहे.
*(अ) स्वयंनिर्णय (ब) साम्यवाद*
*(क) लोकशाही (ड) भांडवलशाही*

(२) -------- विरुद्धच्या कारवाईत अमेरिकेने बहुराष्ट्रीय सैन्याचे नेतृत्व केले.
*(अ) अफगाणिस्तान (ब) इराक*
*(क) इराण (ड) सौदी अरेबिया*

(३) डेंग शाओपिंग यांच्या नेतृत्वाखाली उदारीकरणाचे धोरण स्वीकारून -------- आर्थिक प्रगती साध्य केली.

*(अ) जपानने (ब) दक्षिण कोरियाने*

*(क) चीनने (ड) सिंगापूरने*

(४) One Belt One Road हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबवून -------- आपले प्रभावक्षेत्र निर्माण केले.

*(अ) रशियाने (ब) अमेरिकेने*

*(क) भारताने (ड) चीनने*

(५) युरोपीय संघातील देशांत -------- हे राष्ट्रीय चलन म्हणून स्वीकारण्यात आले.

*(अ) पाऊंड (ब) युरो (क) फ्रेंक (ड) डोईश मार्क*

**उत्तरे :**

(१) वांशिक राष्ट्रवादाची संकल्पना स्वयंनिर्णय या तत्त्वावर आधारित आहे.

(२) इराक विरुद्धच्या कारवाईत अमेरिकेने बहुराष्ट्रीय सैन्याचे नेतृत्व केले.

(३) डेंग शाओपिंग यांच्या नेतृत्वाखाली उदारीकरणाचे धोरण स्वीकारून चीनने आर्थिक प्रगती साध्य केली.

(४) One Belt One Road हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबवून चीनने आपले प्रभावक्षेत्र निर्माण केले.

(५) युरोपीय संघातील देशांत युरो हे राष्ट्रीय चलन म्हणून स्वीकारण्यात आले.

## प्र. २ पुढीलपैकी प्रत्येक गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा : *(प्रत्येकी १ गुण)*

**(१)** (अ) शीतयुद्धाची समाप्ती पूर्व–पश्चिम वादाचा अखेर

(ब) सोव्हिएत युनियनचे विघटन–नवीन राष्ट्रांचा उदय

(क) द्विध्रुवीयता संपुष्टात आली–रशियाचे वर्चस्व प्रस्थापित झाले

(ड) चीन व भारताचा वाढता प्रभाव–बहुध्रुवीयता व्यवस्थेचा उदय.

**(२)** (अ) ११ सप्टेंबर २००१–अमेरिकेविरुद्ध दहशतवादी हल्ला

(ब) स्वयंनिर्णयाच्या हक्कांवर आधारित वांशिक राष्ट्रवाद–युगोस्लाव्हियाचे विघटन

(क) पूर्व युरोपीय राज्यक्रांती–अधिक स्वातंत्र्य व आर्थिक स्थैर्य मिळावे ही मध्यमवर्गाची आकांक्षा

(ड) सोव्हिएत रशियाचे विघटन–चेक गणराज्य आणि स्लाव गणराज्याचा उदय.

**(३)** (अ) वांशिक राष्ट्रवाद–पूर्व तिमोरला इंडोनेशियापासून स्वातंत्र्य

(ब) वांशिक राष्ट्रवाद–इरिट्रियाला इथियांपासून स्वातंत्र्य

(क) कोसावो–स्पेनपासून स्वातंत्र्य हवे आहे

(ड) चेचन्या–रशियापासून स्वातंत्र्य हवे आहे.

**(४)** (अ) जॉर्ज एच. बुश (सिनियर)–कुवेतची इराकपासून सुटका

(ब) फ्रान्सिस फुकुयामा–इतिहासाचा अंत

(क) जोसेफ नाय–सत्तेचे हार्ड पॉवर आणि सॉफ्ट पॉवर असे वर्गीकरण

(ड) पुतीन–सोव्हिएत रशियाचे विघटन.

**उत्तरे : दुरुस्त जोड्या –**

**(१)** (क) द्विध्रुवीयता संपुष्टात आली–अमेरिकेचे वर्चस्व प्रस्थापित झाले

**(२)** (ड) सोव्हिएत रशियाचे विघटन–बेलारुस आणि युक्रेन या राज्यांचा उदय

**(३)** (क) कोसावो–सर्बियापासून स्वातंत्र्य हवे आहे

**(४)** (ड) पुतीन–विघटनानंतर रशियाचा उदय.

## प्र. ३ दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा : *(प्रत्येकी १ गुण)*

(१) प्रादेशिकवादाचा विकास झाला; कारण --------

*(अ) सोव्हिएट युनियनचे विघटन झाले*

*(ब) अमेरिकेचे वर्चस्व संपुष्टात आले*

*(क) भारत व चीन या राष्ट्रांचा प्रभाव वाढला.*

(२) बहुध्रुवीय जागतिक व्यवस्था अस्तित्वात आली; कारण --------

*(अ) रशिया, चीन, भारत, इंडो-पॅसिफिक प्रदेशांचे प्रस्थ वाढले*

*(ब) शीतयुद्ध संपुष्टात आले*

*(क) सोव्हिएट युनियनचे विघटन झाले.*

(३) मानवतावादी हस्तक्षेप या हक्क संरक्षणाच्या नवीन संकल्पनेचा उदय झाला; कारण --------

*(अ) संयुक्त राष्ट्रांनी मानवी अधिकारांची सनद स्वीकारली*

*(ब) उदारमतवादी लोकशाहीचा प्रसार झाला*

*(क) मानवी हक्कांबद्दलची वाढती मानसिकता आणि आंतरराष्ट्रीय कायद्याचे पाठबळ.*

**उत्तरे :** (१) प्रादेशिकवादाचा विकास झाला; कारण भारत व चीन या राष्ट्रांचा प्रभाव वाढला.

(२) बहुध्रुवीय जागतिक व्यवस्था अस्तित्वात आली; कारण रशिया, चीन, भारत, इंडो-पॅसिफिक प्रदेशांचे प्रस्थ वाढले.

(३) मानवतावादी हस्तक्षेप या हक्क संरक्षणाच्या नवीन संकल्पनेचा उदय झाला; कारण मानवी हक्कांबद्दलची वाढती मानसिकता आणि आंतरराष्ट्रीय कायद्याचे पाठबळ.

**प्र. ❹ दिलेल्या विधानांसाठी समर्पक संकल्पना लिहा :** ***(प्रत्येकी १ गुण)***

*(१) जेव्हा एक राज्य इतर राज्यांवर लष्करी ताकदीच्या वापराशिवाय प्रभाव पाडते –

*(२) जागतिक घडामोडींवर प्रभाव टाकण्याची व स्वतःचे हित साधण्याची क्षमता तसेच आंतरराष्ट्रीय राजकारणात महत्त्वाचे स्थान असलेले राज्य –

(३) युगोस्लाव्हियाचे विघटन होऊन नवीन राष्ट्रे उदयास आली –

(४) वैयक्तिक स्वातंत्र्याला महत्त्वाचे स्थान असलेली प्रातिनिधिक लोकशाही व्यवस्था –

(५) पात्र व्यक्तींना २६ युरोपीय देशांत मुक्तपणे प्रवास करण्याची परवानगी –

**उत्तरे :** (१) महासत्ता (२) सॉफ्ट पॉवर (३) वांशिक राष्ट्रवाद (४) उदारमतवादी लोकशाही (५) शेंगेन व्हिसा.

**प्र. ❺ गटात न बसणारा शब्द ओळखा व लिहा :** ***(प्रत्येकी १ गुण)***

(१) युरोझोन मधील देश : (अ) फ्रान्स (ब) स्वीडन (क) जर्मनी (ड) इटली

(२) सार्कचे सदस्य : (अ) चीन (ब) भारत (क) पाकिस्तान (ड) बांग्लादेश

(३) बीम्सटेकचे सदस्य : (अ) भारत (ब) पाकिस्तान (क) बांग्लादेश (ड) नेपाळ


(४) शांघाय सहकार्य संघटनचे सदस्य : (अ) चीन (ब) रशिया (क) भारत (ड) अमेरिका

(५) युगोस्लाव्हियाच्या विघटनातून उदयास आलेली राष्ट्रे : (अ) स्लाव गणराज्य (ब) क्रोएशिआ (क) सर्बिया (ड) बोस्निया


**उत्तरे :** (१) स्वीडन (२) चीन (३) पाकिस्तान (४) अमेरिका (५) स्लाव गणराज्य.

**प्र. ❻ पुढील संकल्पना चित्रे पूर्ण करा :** ***(प्रत्येक मुद्द्यासाठी १ गुण)***


*(१)




**उत्तर :**





*(२)





**उत्तर :**




(३)




**उत्तर :**




**प्र. ❼ पुढील नकाशांचे निरीक्षण करून त्या पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :** ***(प्रत्येकी ५ गुण)***

***[ १ ] पाठ्यपुस्तकातील पृ. १० वरील नकाशाचे निरीक्षण करून पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

**(१) शेंगेन क्षेत्रातील कोणत्याही पाच देशांची नावे लिहा.**

**उत्तर :** फ्रान्स, स्पेन, पोर्तुगाल, इटली आणि जर्मनी हे शेंगेन क्षेत्रातील चार देश आहेत.

**(२) युरोपीय महासंघाचे सदस्य नसलेल्या मात्र शेंगेन क्षेत्रात असलेल्या कोणत्याही दोन देशांची नावे लिहा.**

**उत्तर :** स्वीडन आणि पोलंड हे युरोपीय महासंघाचे सदस्य नसलेले देश आहेत.

**[२] पाठ्यपुस्तकातील पृ. ३ वरील नकाशाचे निरीक्षण करून पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

**(१) सोव्हिएट रशियातील सर्वांत मोठे घटकराज्य कोणते ?**

**उत्तर :** सोव्हिएट रशियातील सर्वांत मोठे घटकराज्य रशिया आहे.

**(२) सोव्हिएट रशियातील पूर्वेकडील दोन घटकराज्यांची नावे लिहा.**

**उत्तर :** ताजिकिस्तान आणि उझबेकिस्तान ही पूर्वेकडील (आशिया खंडातील) दोन घटकराज्ये आहेत.

**(३) सोव्हिएट रशियातील पश्चिमेकडील दोन देशांची नावे लिहा.**

**उत्तर :** एस्टोनिया आणि लाटव्हिया ही सोव्हिएट रशियातील पश्चिमेकडील (युरोप खंडातील) दोन घटकराज्ये आहेत.

## प्र. ८ पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण लिहा : *(प्रत्येकी २ गुण)*

*** (१) दक्षिण आशियातील व्यापारासाठी सार्क महत्त्वाचे आहे.**

**उत्तर :** वरील विधान **बरोबर** आहे.

**कारण :** दक्षिण आशिया मुक्त व्यापार व्यवस्था सन २००६ साली कार्यान्वित झाली.

*** (२) मास्त्रीक्त करार युरोपच्या संरक्षणासाठी करण्यात आला.**

**उत्तर :** वरील विधान **चूक** आहे.

**कारण :** युरोपीय युनियन स्थापन करण्यासाठी मास्त्रीक्त करार करण्यात आला होता.

*** (३) १९८०च्या दशकाला मानवतावादी हस्तक्षेपाचा सुवर्णकाळ म्हणतात.**

**उत्तर :** वरील विधान **चूक** आहे.

**कारण :** १९९०च्या दशकाला मानवतावादी हस्तक्षेपाचा सुवर्णकाळ म्हणतात.

**(४) १९९०च्या दशकाला मानवतावादी हस्तक्षेपाचा सुवर्णकाळ म्हणतात.**

**उत्तर :** वरील विधान **बरोबर** आहे.

**कारण :** १९९०च्या दशकात संयुक्त राष्ट्रांनी कंबोडिया, सोमालिया आणि युगोस्लाव्हिया या देशांत मानवतावादी हस्तक्षेप करून शांतता प्रस्थापित केली.

**(५) पूर्व युरोपातील साम्यवादी शासनांविरुद्ध जनतेने उठाव केला.**

**उत्तर :** वरील विधान **बरोबर** आहे.

**कारण :** त्या देशांतील मध्यमवर्गीयांना अधिक स्वातंत्र्य आणि आर्थिक स्थैर्य मिळवायची आकांक्षा होती.

**(६) १९९० नंतर युरोपात अनेक नवीन राष्ट्रे निर्माण झाली.**

**उत्तर :** वरील विधान **बरोबर** आहे.

**कारण :** वांशिक अस्मितेवर आधारित स्वतंत्र राष्ट्रांची मागणी सोव्हिएट रशिया, युगोस्लाव्हिया आणि चेकोस्लोव्हाकिया मध्ये प्रबळ झाली होती.

**(७) राष्ट्रीय विघटन आणि नव्या राष्ट्रांचा उदय ही प्रक्रिया नेहमीच शांततामय असते.**

**उत्तर :** वरील विधान **चूक** आहे.

**कारणे :** (१) युगोस्लाव्हियाच्या बोस्निया आणि र्झेगोविना प्रांतांमध्ये प्रचंड प्रमाणात वांशिक हिंसाचार झाला.

(२) चेचन्या, पूर्व तिमोर आणि एरिट्रिया या प्रदेशांत सशस्त्र संघर्ष झाला.

**(८) इंडो-पॅसिफिक प्रदेशाचे महत्त्व वाढीस लागले आहे.**

**उत्तर :** वरील विधान **बरोबर** आहे.

**कारणे :** (१) चीन आणि भारताने आर्थिक प्रगतीचा मोठा टप्पा गाठला आहे.

(२) ASEAN संघटना पॅसिफिक क्षेत्रात प्रभावी कार्य करीत आहे.

(३) पॅसिफिक प्रदेशात अमेरिकेला स्वारस्य आहे.

**(९) संयुक्त राष्ट्रांकडे स्वतःचे सैन्य असते.**

**उत्तर :** वरील विधान **चूक** आहे.

**कारणे :** (१) संयुक्त राष्ट्रांकडे स्वतःचे सैन्य नसते.

(२) मात्र जागतिक शांतता व सुरक्षितता प्रस्थापित करण्यासाठी सदस्य राष्ट्रांच्या सैन्यदलातून संयुक्त राष्ट्र शांतता रक्षक दल उभारले जाते.

**(१०) अमेरिकाप्रणीत एकध्रुवीय व्यवस्थेस चीनने शक्तिशाली आव्हान दिलेले आहे.**

**उत्तर :** वरील विधान **बरोबर** आहे.

**कारण :** १९७०च्या मध्यात चीनने डेंग शाओपिंग यांच्या नेतृत्वाखाली उदारीकरणाचे धोरण स्वीकारून आर्थिक प्रगती साध्य करून, जगात प्रबळ स्थान निर्माण केले.

## प्र. ९ सहसंबंध स्पष्ट करा : *(प्रत्येकी ३ गुण)*

**(१) आर्थिक हितसंबंध आणि व्यापारीगट.**

**उत्तर :** (१) शीतयुद्धोत्तर काळात आपले आर्थिक हितसंबंध जोपासण्यासाठी जगातील राष्ट्रे प्रयत्नशील होती.

(२) आपले आर्थिक हितसंबंध जोपासण्यासाठी त्यांनी प्रादेशिक स्तरावर व्यापारी गटांची स्थापना केली.

(३) त्यासाठी त्यांनी व्यापारविषयक विशेष करार केले. त्याद्वारा आयातीवरील कर कमी केले. आयात प्रमाणावरील मर्यादा कमी केल्या.

(४) आग्नेय आशियातील देशांनी ASEAN, दक्षिण आशियातील देशांनी SAARC आणि युरोपीय देशांनी European Common Market आणि त्यानंतर European Union असे व्यापारी गट स्थापन केले.

**(२) मुक्त व्यापार आणि प्रादेशिक संघटन.**

**उत्तर :** (१) वस्तूंच्या अनिर्बंधित–मुक्त व्यापारामुळे आर्थिक समस्यांचे निराकरण होईल, परस्परावलंबन वाढेल, आर्थिक समन्वय घडून येईल आणि लोकांमध्ये एकमेकांप्रती सद्भावना जागृत होईल.

(२) मुक्त व्यापार आणि आर्थिक विकास या उद्देशाने दक्षिण-पूर्व आशियातील राष्ट्रांनी ASEAN, तर युरोपीय राष्ट्रांनी European Union ची स्थापना केली.

**(३) पूर्व युरोपीय राज्यांमधील क्रांती आणि मध्यमवर्गाच्या आकांक्षा.**

**उत्तर :** (१) शीतयुद्धोत्तर कालखंडात पूर्व युरोपातील राज्यांत साम्यवादी राजवटींविरुद्धचा असंतोष तीव्र झाला.

(२) या देशातील क्रांती तेथील मध्यमवर्गाच्या वाढत्या अपेक्षांतून निर्माण झाली.

(३) मध्यमवर्गीयांना आर्थिक स्वातंत्र्य आणि आर्थिक स्थैर्य प्राप्त व्हावे यासाठी साम्यवादी शासनांविरुद्ध त्यांनी उठाव केले

**(४) सोव्हिएट रशियाचे विघटन–वांशिक राष्ट्रवाद.**

**उत्तर :** (१) १९८० च्या दशकात रशियाचे पंतप्रधान मिखाईल गोर्बाचेव्ह यांनी आपल्या देशात राजकीय व आर्थिक सुधारणांचा कार्यक्रम हाती घेतला.

(२) १९९० च्या दशकात सोव्हिएट रशियाच्या अंतर्गत राजकीय आणि आर्थिक स्वातंत्र्य मिळवण्यासाठी आणि आर्थिक स्वायत्तता मिळवण्यासाठी बिगर-रशियन लोकसमूहांनी चळवळी सुरू केल्या.

(३) कालांतराने वांशिक अस्मिता प्रबळ होऊन बिगर-रशियन लोकसमूहांनी स्वातंत्र्याची मागणी केली. त्यातून रशियाचे विघटन घडून आले आणि वांशिक राष्ट्रवादावर आधारित १४ स्वतंत्र राष्ट्रे निर्माण झाली.

**(५) वांशिक राष्ट्रवाद–नवीन राष्ट्रांचा उदय.**

**उत्तर :** (१) शीतयुद्धोत्तर कालखंडात वांशिक राष्ट्रवाद तीव्र झाला.

(२) सोव्हिएट रशियाचे विघटन होऊन वांशिक अस्मितेवर आधारित १४ नवीन राष्ट्रे निर्माण झाली.

(३) चेकोस्लोव्हाकियाचे चेक गणराज्य आणि स्लाव गणराज्य या दोन राष्ट्रांत विभाजन झाले.

(४) युगोस्लाव्हियातील वांशिक संघर्ष तीव्र होऊन त्या देशाचे विघटन होऊन ६ नवीन राष्ट्रे निर्माण झाली.

**(६) कुवेत युद्ध आणि अमेरिकेच्या वर्चस्वाला जागतिक मान्यता.**

**उत्तर :** (१) १९९० मध्ये इराकने कुवेतचा भूप्रदेश काबीज केला.

(२) इराकविरुद्धच्या युद्धात बहुराष्ट्रीय सेनेचे नेतृत्व अमेरिकेने केले.

(३) या जागतिक परिस्थितीचे वर्णन अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉर्ज बुश यांनी New World Order असे केले. या नवीन जागतिक व्यवस्थेचा अर्थ जागतिक पातळीवर अमेरिकन वर्चस्वाला सार्वत्रिक मान्यता असा होता. एकध्रुवीय जागतिक व्यवस्थेची ही अभिव्यक्ती होती.

**(७) हार्ड पॉवर आणि सॉफ्ट पॉवर.**

**उत्तर :** जागतिक पातळीवर देशाचा महासत्ता म्हणून उदय हार्ड पॉवर आणि सॉफ्ट पॉवर यांच्या एकत्रिकरणामुळे होतो. हार्ड पॉवरमध्ये आर्थिक निर्बंध आणि लष्करी बळ अशा गोष्टी येतात. तर सॉफ्ट पॉवरमध्ये देशाची प्रतिष्ठा, सांस्कृतिक प्रभाव आणि परंपरा हे घटक येतात.

**(८) अमेरिकेच्या वर्चस्वाला आव्हान–बहुध्रुवीय व्यवस्थेचा उदय.**

**उत्तर :** (१) सोव्हिएट रशियाच्या विघटनानंतर जागतिक व्यवस्थेवर अमेरिकेचे निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित झाले होते.

(२) अलीकडच्या काळात अमेरिकेच्या वर्चस्वाला युरोपियन युनियन, चीन, जपान, भारत आणि रशिया यांनी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष आव्हान दिले आहे.

(३) प्रादेशिक संघटनांचे महत्त्व वाढत आहे. त्यामुळे एकध्रुवीय जागतिक व्यवस्थेचे रूपांतर बहुध्रुवीय व्यवस्थेत झाले आहे.

**(९) मानवी हक्क आणि मानवतावादी हस्तक्षेप.**

**उत्तर :** (१) १९९० च्या दशकात राष्ट्रांचे विघटन आणि नव्या राष्ट्रांचा उदय होत असतानाच प्रचंड प्रमाणात वांशिक अत्याचार आणि मानवी हक्कांची पायमल्ली घडली.

(२) या अभूतपूर्व परिस्थितीत जगाला मानवाधिकार आणि शांतता रक्षणाची जबाबदारी असणाऱ्या संयुक्त राष्ट्रे या जागतिक संघटनेने हस्तक्षेप करणे अपेक्षित होते.

(३) त्यातूनच मानवतावादी हस्तक्षेपाची संकल्पना उदयास आली. आंतरराष्ट्रीय कायद्याचे पाठबळ असलेल्या संयुक्त राष्ट्रांनी कंबोडिया, सोमालिया आणि युगोस्लाव्हिया या देशांत मानवी हक्कांची जोपासना करण्यासाठी मानवतावादी हस्तक्षेप केला.

## प्र. १० आपले मत २५ ते ३० शब्दांत नोंदवा : *(प्रत्येकी ४ गुण)*

***(१) मानवतावादी हस्तक्षेप.**

**उत्तर :** संयुक्त राष्ट्रांद्वारा युद्धग्रस्त क्षेत्रात शांतता प्रस्थापित करण्यासाठी मानवतावादी हस्तक्षेप आवश्यक आहे. भारताने अशा हस्तक्षेपाचे समर्थन केले आहे. कंबोडियात शांतता प्रस्थापित करण्याच्या आणि युद्धग्रस्त क्षेत्रातील जनजीवन सामान्य करण्याच्या मार्गात भारताने महत्त्वाची भूमिका पार पाडली.

***(२) आंतरराष्ट्रीय राजकारणातील प्रादेशिकतावाद.**

**उत्तर :** १९९० च्या दशकात आंतरराष्ट्रीय राजकारणातील अमेरिकेच्या आधिपत्यास प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या आव्हान देण्याचा संघटित प्रयत्न अन्य देशांनी केला आहे. एकध्रुवीय आंतरराष्ट्रीय व्यवस्थेवर नियंत्रण प्रस्थापित करणे गरजेचे आहे. याच जाणिवेतून

युरोपियन युनियनची स्थापना झाली. त्याचप्रमाणे रशिया, चीन, भारत, ब्राझील आणि दक्षिण आफ्रिका या देशांच्या BRICS या संघटनेची स्थापना झाली. आंतरराष्ट्रीय राजकारणातील प्रादेशिकतावादाद्वारा सत्ता संतुलन जोपासले जाईल आणि अमेरिके-सारखी महासत्ता आपली मनमानी करू शकणार नाही.

**(३) उदारमतवादी लोकशाही.**

**उत्तर :** उदारमतवादी लोकशाही ही एक प्रबळ विचारधारा आहे. पूर्व युरोपातील पूर्वाश्रमीच्या साम्यवादी राजवटींनी अमेरिका-प्रणीत उदारमतवादी लोकशाही विचारधारा स्वीकारली आहे. या विचारधारेत वैयक्तिक स्वातंत्र्याला महत्त्वाचे स्थान आहे. त्याचबरोबर तो एक शासनप्रकार आहे. त्याचा स्वीकार भारताने केला आहे.

**(४) शीतयुद्धोत्तर दहशतवाद.**

**उत्तर :** शीतयुद्धाच्या कालखंडात दहशतवाद स्थानिक/प्रादेशिक स्वरूपाचा होता. फुटिरतावादी चळवळ असे त्याचे स्वरूप होते. शीत-युद्धोत्तर काळात त्यास व्यापक जागतिक स्वरूप प्राप्त झाले आहे. दहशतवादी संघटना सुसज्ज असून, प्रगत तांत्रिक संघटनांचा वापर करतात. बव्हंशी दहशतवादी संघटना इस्लामिक स्वरूपाच्या आहेत आणि इस्लामेतर धर्म असलेल्या देशांशी त्या संघर्ष करतात.

**(५) ब्रेक्झिट (Brexit).**

**उत्तर :** (१) २०१६ साली ब्रिटिश नागरिकांनी जनमताद्वारे युरोपीय संघ सोडण्याचा निर्णय घेतला. ३१ जानेवारी २०२० च्या मध्यरात्री युनायटेड किंगडमने औपचारिकरीत्या युरोपियन युनियनचे सदस्यत्व समाप्त केले. या प्रक्रियेला 'ब्रेक्झिट' असे नाव दिले गेले.

(२) ब्रेक्झिट हे ब्रिटिश राष्ट्रवादाच्या बाजूने मांडलेले आग्रही मत आहे.

(३) राज्यसंस्था ही संकल्पना आजही आपले महत्त्व टिकवून आहे हे यातून सिद्ध होते.

(४) यामागची ब्रिटिश जनमताची धारणा अशी होती की, जगातील एकेकाळी सर्वांत सामर्थ्यशाली साम्राज्यातील जनतेला युरोपियन युनियनचे सदस्यत्व मांडलिक राज्य (vassal state) आहे असे वाटत होते. अशा विमनस्क अवस्थेत राहण्यापेक्षा युरोपियन युनियनमधून बाहेर पडणे राष्ट्रीय अस्मितेशी सुसंगत आहे.

**प्र. ११ पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :** ***(प्रत्येकी ५ गुण)***

*** (१) सॉफ्ट पॉवर म्हणजे काय ते उदाहरणांसह स्पष्ट करा.**

**उत्तर :** (१) अमेरिकन समाजशास्त्रज्ञ जोसेफ नाय याने सॉफ्ट पॉवर (Soft power) ही संकल्पना प्रतिपादित केली आहे.

(२) सॉफ्ट पॉवर म्हणजे अशी क्षमता की ज्यामुळे विशिष्ट देशाला जे हवे आहे ते अन्य देशांनाही हवेसे वाटते.

(३) सॉफ्ट पॉवरमध्ये सक्तीच्या ऐवजी आकर्षण निर्माण करून आपली उद्दिष्टे साध्य करण्याची क्षमता असणे.

(४) अमेरिकेच्या सॉफ्ट पॉवरची काही उदाहरणे पुढीलप्रमाणे आहेत :

(अ) शैक्षणिक देवाण-घेवाण कार्यक्रमाद्वारा अमेरिकेत अन्य देशांतून बुद्धिमान विद्यार्थ्यांना मोठ्या संख्येत आकर्षित करण्यात आले आहे. शिक्षण पूर्ण केल्यानंतर बहुसंख्य विद्यार्थी अमेरिकेत स्थायिक होतात. त्याद्वारा अमेरिकेत उच्चशिक्षित तंत्रज्ञ उपलब्ध होतात.

(ब) आंतरजालच्या माध्यमातून अमेरिकेला अभिप्रेत असलेल्या उदारमतवादी लोकशाही व अभिव्यक्ती स्वातंत्र्य या विचारांचा प्रसार जगभर झाला आहे.

(क) मॅकडोनाल्ड, सबवे, पिझाहट, बर्गर किंग इत्यादी फूड चेन्स-द्वारा अमेरिकन खाद्य संस्कृतीचा जगभर प्रसार झाला आहे.

**(२) एकध्रुवीय जागतिक व्यवस्थेच्या उदयाचे विवरण करा.**

**उत्तर :** (१) इराकने १९९० साली कुवेतवर आक्रमण केल्याचे पडसाद जागतिक स्तरावर आणि संयुक्त राष्ट्रात उमटले.

(२) इराकविरुद्ध कारवाई करणाऱ्या बहुराष्ट्रीय सैन्याचे नेतृत्व अमेरिकेने केले. अमेरिकेच्या इराकविरुद्धच्या कृतीला जगभर पाठिंबा मिळाला. अमेरिकेला पाठिंबा देणाऱ्या देशांमध्ये सोव्हिएट रशियादेखील होती.

(३) या नव्या जागतिक परिस्थितीला अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉर्ज एस बुश (सिनिअर) यांनी New World Order असे म्हटले.

(४) अंतर्गत समस्येने ग्रस्त सोव्हिएट रशियाचे १९९१ साली विघटन झाल्यानंतर अमेरिकेसमोर वैचारिक आव्हान शिल्लक राहिले नाही.

(५) नवीन जागतिक अवस्था या संज्ञेचा अर्थ अमेरिकन वर्चस्वाला आणि नेतृत्वाला सार्वत्रिक स्वीकृती, असा होतो.

अशा प्रकारे १९९० च्या दशकात एकध्रुवीय जागतिक व्यवस्थेचा उदय झाला.

**(३) एकध्रुवीय जागतिक व्यवस्थेचे विवरण करा.**

**उत्तर :** (१) १९९० च्या इराक युद्धानंतर अमेरिकेच्या नेतृत्वाखाली नवीन जागतिक व्यवस्था उदयास आली. त्याला सर्वमान्यता प्राप्त झाली.

(२) अमेरिकेच्या उदारमतवादी लोकशाहीचा स्वीकार पूर्व युरोपातील पूर्वाश्रमीच्या साम्यवादी राजवटीने केला.

(३) १९९० च्या दशकात अनेक देशांनी समाजवादी अर्थव्यवस्थेचा त्याग करून भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला. १९९१ मध्ये नवीन आर्थिक धोरणाद्वारा भारतानेही भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला.

(४) अमेरिकेने सॉफ्ट पॉवर द्वारा म्हणजेच सैनिकी बळाचा वापर न करता अन्य देशांना प्रभावित केले.

(५) शैक्षणिक देवाण-घेवाण, आंतरजाल आणि फूड चेन्स द्वारा अमेरिकेचा प्रभाव सर्वव्यापी झाला.

(६) १९९० च्या दशकात अमेरिका जगावर अधिराज्य करणारी एकमेव महासत्ता होती.

**(४) शीतयुद्धोत्तर काळातील मानवी हक्क संवर्धनासाठी करण्यात आलेली उपाययोजना लिहा.**

**उत्तर :** (१) १९९० पासून अनेक देशांनी मानवी हक्कां-संदर्भातील सहा मुख्य conventions सनदी आणि करारांना मंजुरी दिली.

(२) व्हिएन्ना येथे पार पडलेल्या १९९३ च्या जागतिक मानवी हक्क परिषदेत १७० हून अधिक देशांनी सहभाग नोंदवला. या परिषदेत त्यांनी मानवी हक्क संरक्षणाबाबत आपल्या जबाबदारीची पुन्हा एकदा पुष्टी केली.

(३) संयुक्त राष्ट्रांचे मानवाधिकार उच्चायुक्तांचे कार्यालय अस्तित्वात आले. त्यांचे मुख्य कार्य संयुक्त राष्ट्रांच्या मानवी हक्कांशी निगडित कार्यक्रमांमध्ये समन्वय साधणे व मानवी हक्कांप्रती सार्वत्रिक आदर प्रस्थापित करणे हे आहे.

(४) १९९० च्या दशकात बिगर-सरकारी संस्थांनी मानवी हक्कां-संबंधीचे विचार प्रस्थापित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

(५) इंटरनॅशनल कमिटी ऑफ द रेड क्रॉस, मेडिसीन्स सान्स फ्रंटीयर आणि ऑक्सफॅम या संस्था मानवी हक्क करार, मानवतावादी कायद्याचे पालन यांचा प्रसार करण्याचे कार्य करतात. या संस्था युद्धग्रस्त क्षेत्रातही मानवी हक्क जोपासण्याच्या मोहिमा हाती घेतात.

**(५) सोव्हिएट रशियाच्या विघटनाचे परिणाम लिहा.**

**उत्तर :** (१) १९९१ साली सोव्हिएट रशियाचे विघटन झाल्याने रशियाच्या आधिपत्याखाली असलेली १५ संघराज्ये स्वतंत्र झाली.

(२) अमेरिका–सोव्हिएट रशिया यांतील सत्तासंघर्ष शीत-युद्धाचा आधार होता. तो आधारच संपुष्टात आल्याने शीतयुद्धाचा शेवट झाला.

(३) सोव्हिएट रशियाच्या विघटनानंतर अमेरिका एकमेव महासत्ता शिल्लक राहिली. त्यामुळे एकध्रुवीय व्यवस्था आणि अमेरिकेचे जागतिक राजकारणावर वर्चस्व प्रस्थापित झाले.

(४) सोव्हिएट रशियाच्या विघटनानंतर, त्याची जागा रशियाने घेतली तसेच त्यातील अन्य १४ देश जगाच्या नकाशावर स्वतंत्र देश म्हणून उदयास आले.

(५) पूर्व युरोपातील पूर्वाश्रमीच्या साम्यवादी राजवटींनी उदार-मतवादी लोकशाहीचा आणि भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला.

**(६) शीतयुद्धोत्तर काळातील प्रादेशिकवादाचे स्वरूप शीतयुद्ध काळातील प्रादेशिक वादापासून कसे वेगळे आहे, ते स्पष्ट करा.**

**उत्तर :** (१) शीतयुद्धाच्या काळात आशिया व आफ्रिका खंडातील देशांनी वसाहतवाद आणि वर्णभेद या राजकीय कारणास्तव प्रादेशिक संघटना उभारल्या.

(२) अमेरिका व रशिया या महासत्तांनी संरक्षणाच्या उद्देशाने NATO, SENTO, CENTRO आणि वोर्सा करार या प्रादेशिक पातळीवरील लष्करी संघटना उभारल्या.

(३) दोन महासत्तांतील संघर्षातून निर्माण होणारा जागतिक तणाव कमी करण्याच्या उद्देशाने अलिप्त राष्ट्र गटाची स्थापना १९६१ साली करण्यात आली.

(४) शीतयुद्धाची तीव्रता कमी झाल्यानंतर आर्थिक हितसंबंधाना प्राधान्य मिळाले. युरोपियन राष्ट्रांनी कोळसा व पोलाद समुदाय, युरोपीय आर्थिक समुदाय, युरोपीय अणुऊर्जासमुदाय आणि अंतिमतः युरोपीय संघाची स्थापना केली.

(५) प्रादेशिक सहकार्याच्या संकल्पनेचा १९६० च्या सुमारास आशियामध्ये प्रसार झाला. १९६७ मध्ये दक्षिण पूर्व आशियातील राष्ट्रांनी ASEAN संघटना, तर दक्षिण आशियातील राष्ट्रांनी १९८५ साली SAARC संघटना स्थापन केली.

(६) व्यापारावर अधिक लक्ष केंद्रित करण्यात आले आणि अनेक व्यापारी गट निर्माण झाले.

**(७) प्रादेशिक संघटनांच्या निर्मितीस जबाबदार असणाऱ्या घटकांचे विवरण करा.**

**उत्तर :** (१) प्रादेशिकवाद हा आंतरराष्ट्रीय संबंधांचा महत्त्वपूर्ण पैलू आहे.

(२) एखादी प्रादेशिक संघटना निर्माण करण्यासाठी अथवा त्याचा भाग होण्यासाठी अनेक देश एकत्र येताना दिसतात.

(३) अशा संघटना समान राजकीय, वैचारिक, आर्थिक इत्यादी घटकांवर आधारलेल्या असू शकतात.

(४) प्रादेशिक संघटना बांधताना देशांनी भौगोलिकरीत्या जोडलेले असणे महत्त्वाचे असते.

(५) या व्यतिरिक्त भौगोलिक क्षेत्रातील दळणवळण आणि संपर्क-व्यवस्था, उर्जास्रोत, आरोग्यव्यवस्था या बाबी त्यास पोषक असतात.

(६) प्रादेशिकवादाची सुरुवात सदस्यांमध्ये घडणाऱ्या राजकीय संवादाने होते. विचारविनिमयाची प्रक्रिया पुढे नेण्यासाठी समान विचारसरणी किंवा आर्थिक हितसंबंध उपयोगात येऊ शकतात. या चर्चेचा परिपाक म्हणजे एखाद्या प्रादेशिक संघटनेची निर्मिती होणे होय.

***(८) प्रादेशिकवाद ही संकल्पना स्पष्ट करा.**

**उत्तर :** (१) विशिष्ट भौगोलिक क्षेत्रातील राष्ट्रे आपले राष्ट्रहित एकत्रपणे साध्य करण्यासाठी जो गट तयार करतात, त्यास प्रादेशिक संघटन (Regional Organisation) असे म्हणतात.

(२) प्रादेशिक पातळीवरील या सहकार्याला प्रादेशिकवाद असे म्हणतात.

(३) याद्वारा हे संघटन स्वतःची स्वतंत्र अस्मिता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करतात.

(४) भौगोलिक क्षेत्रातील संघटनप्रमाणेच ऊर्जा, दळणवळण, आरोग्य इत्यादी विशिष्ट कार्यांसाठीही गट स्थापन केले जातात.

(५) आपापसातील संवादातून प्रादेशिकतावादाची सुरुवात होते. अशा संवादातून युरोपियन युनियन, आसियन, सार्क यांसारख्या संघटना निर्माण झाल्या.

(६) आसियन ही आग्नेय आशियातील राष्ट्रांची, तर सार्क ही दक्षिण आशियातील राष्ट्रांची प्रादेशिक संघटना आहे.

**(९) चीनच्या सामर्थ्यवाढीचे विवरण करा.**

**उत्तर :** (१) अमेरिकाप्रणीत एकध्रुवीय जगात चीनने शक्तिशाली आव्हान दिलेले आहे.

(२) १९७० च्या मध्यात डेंग शाओपिंग यांच्या नेतृत्वाखाली चीनने उदारीकरणाचे धोरण स्वीकारून आर्थिक प्रगती साध्य केली आणि जगात प्रबळ स्थान प्राप्त केले.

(३) चीनने One Belt One Road आणि चीन–पाकिस्तान आर्थिक कॉरिडोर यांसारखे महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबवण्यास सुरुवात करून आपले प्रभावक्षेत्र निर्माण केले. मध्य आशिया आणि पूर्व आशिया या प्रदेशांवर वर्चस्व गाजवण्यास सुरुवात केली.

(४) आफ्रिकेत देखील प्रवेश करून शेजारी देशांपलीकडे प्रभाव पाडण्याची आकांक्षा दाखवली.

(५) दक्षिण चिनी सागरावर आपला हक्क सांगण्याकरीता चीन आपले नौदल व वायुसेना भक्कमपणे उभारत आहे.

**(१०) युरोपीय संघाचे विवरण करा.**

**उत्तर :** (१) दुसरे महायुद्ध व त्यानंतर शीतयुद्ध यांमुळे आलेल्या सततच्या अस्थिरतेमुळे युरोपमधील देशांना कायमच एकत्र येण्याची प्रेरणा मिळाली आहे. युरोपीय संघाची सुरुवात आर्थिक सहकार्य दृढ करणारी संस्था म्हणून झाली.

(२) ७ फेब्रुवारी १९९२ रोजी 'मास्त्रीक्त' करार अंमलात येऊन युरोपीय संघाची स्थापना झाली.

(३) या करारामुळे सहकार्याचा परिघ वाढला आणि त्यात अंतर्गत व्यवहार, न्यायालयीन बाबी, परराष्ट्र आणि संरक्षण धोरणांचा समावेश झाला.

(४) या करारातून आर्थिक पातळीवर एकीकरण होऊन 'युरो' या समान चलनाचा उदय झाला. युरो (€) हे युरोपीय संघामधील २८ पैकी १९ देशांचे अधिकृत चलन आहे. या देशांना एकत्रितपणे 'युरोझोन' म्हणून ओळखले जाते.

(५) निव्वळ आर्थिक संघटनाच्या दृष्टीने सुरू झालेली युरोपीय सहकार्याची प्रक्रिया विकसित होऊन आता हे संघटन हवामानबदल, पर्यावरण, आरोग्य, परराष्ट्रसंबंध, सुरक्षा व स्थलांतर अशा विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत आहे.

(६) शेंगेन प्रदेशाची निर्मिती ही युरोपीय संघाची सगळ्यात मोठी कामगिरी मानली जाते. शेंगेन कराराद्वारे सगळ्या सदस्य देशांमधील अंतर्गत सीमा नष्ट करण्यात आल्या. शेंगेन व्हिसा पात्र व्यक्तींना २६ सहभागी देशांमध्ये मुक्तपणे प्रवास करण्याची परवानगी देते.

**(११) भारताच्या मानवतावादी कार्याचे विवरण करा.**

**उत्तर :** (१) भारत संयुक्त राष्ट्रांचा सदस्य आहे. संयुक्त राष्ट्रांच्या मानवतावादी कार्यात भारताचे कार्य उल्लेखनीय आहे.

(२) भारत संयुक्त राष्ट्रांच्या कंबोडियातील संक्रमण प्राधिकरणात फेब्रुवारी १९९२ ते सप्टेंबर १९९३ या कालखंडात सहभागी झाला होता. तसेच संयुक्त राष्ट्रांच्या सोमालियातील मोहिमेत मार्च १९९३ ते डिसेंबर १९९४ या कालखंडात सहभागी झाला होता.

(३) या दोन युद्धग्रस्त देशांत शांतता राखण्यासाठी व मानवी हक्कांप्रती आदर निर्माण करण्यासाठी भारताने सैन्य व पोलिस दले पाठवली होती.

(४) कंबोडियामध्ये कायदा व सुव्यवस्था राखणे, मुक्त निवडणुकांचे आयोजन करणे, नागरी प्रशासन प्रस्थापित करणे, निर्वासितांचे प्रत्यवर्तन आणि पुनर्वसन ही कामगिरी पार पाडली होती.

(५) सोमालियात भारतीय सैन्याने विहिरी खणणे, शाळा आणि प्रार्थनास्थळे बांधणे, फिरते दवाखाने व आरोग्य शिबिरांचे आयोजन आणि निर्वासितांचे पुनर्वसन ही मानवतावादी कार्ये केली.

**(१२) दहशतवादाच्या स्वरूपाचे विवरण करा.**

**उत्तर :** (१) संघटनेची राजकीय, धार्मिक आणि वैचारिक उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी हिंसाचार किंवा हिंसाचाराच्या घटनांनी समाजात भीती निर्माण करणे यास दहशतवाद आणि त्याचा अवलंब करणाऱ्या संघटनांना दहशतवादी संघटना असे म्हणतात.

(२) शीतयुद्धाच्या काळात १९७२ साली म्युनिक येथे इस्रायली ऑलिम्पिक संघावर पॅलिस्टिनी दहशतवाद्यांनी केलेला हल्ला हे आधुनिक दहशतवादाचे पहिले उदाहरण आहे.

(३) ११ सप्टेंबर २००१ रोजी अल कायदा संघटनेच्या दहशतवाद्यांनी न्यूयॉर्क येथील वर्ल्ड ट्रेंड सेंटर आणि वॉशिंग्टनमधील पेंटागयानवर केलेला हल्ला शीतयुद्धोत्तर काळातील दहशतवादाचे पहिले उदाहरण आहे.

(४) शीतयुद्धाच्या काळातील दहशतवाद मुख्यतः सरकारी संघटनांवर हल्ले करून, राजकीय नेत्यांची हत्या करून, विमान अपहरण करून विशिष्ट समुदायाच्या हक्कांसाठी संघर्ष करीत असत.

(५) मात्र शीतयुद्धोत्तर काळातील विशिष्ट क्षेत्र किंवा विशिष्ट समुदायापुरते हे सीमित नाही. अमूर्त स्वरूपाच्या धार्मिक विचारसरणीने प्रेरित झालेल्या संघटना वैश्विक पातळीवर कार्य करतात.

(६) २००२ साली बाली, २००४ साली मांद्रिद, २००५ साली लंडन आणि २००८ साली मुंबईवर झालेला हल्ला अशाच प्रकारच्या दहशतवादी कारवायांची उदाहरणे आहेत.

**प्र. १२ दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा : *(प्रत्येकी १० गुण)***

***(१) युरोपीय महासंघाबाबत पुढील मुद्द्यांच्या आधारे चर्चा करा :**

**[मुद्दे : (अ) इतिहास (ब) युरोपियन आयोग (क) युरोपियन संसद (ड) युरोपियन परिषद (ई) युरोपियन न्यायालय.]**

**उत्तर :** युरोपियन महासंघ European Union चे विवरण पुढीलप्रमाणे आहे :

**(अ) इतिहास :** दुसऱ्या महायुद्धानंतर युरोपीय देशांनी आर्थिक समन्वय प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने सन १९५१ मध्ये युरोपीय कोळसा व पोलाद समुदाय सन १९५७ मध्ये युरोपीय आर्थिक समुदाय आणि सन १९५८ मध्ये युरोपीय अणुऊर्जा समुदाय या संघटना स्थापन केल्या. या संघटना एकमेकांत विलीन होऊन युरोपीय बाजारपेठेची आणि मीस्त्राक्त कराराद्वारा सन १९९२ मध्ये युरोपीय महासंघाची स्थापना झाली.

**(ब) युरोपियन आयोग :** युरोपियन आयोग ही महासंघाची नोकरशाही–कार्यकारी यंत्रणा आहे. हा आयोग युरोपियन संसदेत घेतलेल्या धोरणात्मक निर्णयांची अंमलबजावणी करतो. तसेच युरोपियन संसदेला कायदे करण्यासाठी प्रस्ताव सुचवतो.

**(क) युरोपियन संसद :** प्रत्यक्ष निवडणुकीद्वारा सदस्य देश संसदेच्या ७५१ सदस्यांची पाच वर्षांच्या कार्यकाळासाठी निवड करतात. संसद कायदेविषयक देखरेख आणि अर्थविषयक कार्ये पार पाडते.

**(ड) युरोपियन परिषद :** महासंघाच्या सदस्य देशांचे राष्ट्राध्यक्ष किंवा प्रधानमंत्री आणि परराष्ट्र मंत्री यांचा समावेश होतो. परिषदेच्या पूर्णवेळ अध्यक्षाची निवड केली जाते. परिषदेच्या वर्षातून चार सभा आयोजिक केल्या जातात. ही संघटना युरोपीय युनियनला सामाजिक नेतृत्व प्रदान करते.

**(ई) युरोपियन न्यायालय :** युरोपियन युनियनमधील कायद्यांचे व करारांचे अर्थ लावणे आणि त्यांच्या आधारे सदस्य देशांतील वादांचा निवाडा करणे ही जबाबदारी युरोपियन न्यायालय पार पाडते. युनियनचे कायदे सदस्य देशांच्या राष्ट्रीय कायद्यांपेक्षा श्रेष्ठ मानले जातात.

**(२) प्रादेशिक संघटनांचे संक्षिप्त विवरण करा :**

**[मुद्दे : (अ) सार्क (ब) बीम्सटेक (क) ब्रिक्स (ड) शांघाय सहकार्य संघटन (ई) जी-२०.**

**उत्तर : (अ) सार्क :** (१) इ. स. १९८५ मध्ये दक्षिण आशियाई प्रादेशिक सहकार संघटन, म्हणजेच SAARC ची स्थापना ढाका येथे करण्यात आली.

(२) अफगाणिस्तान, पाकिस्तान, भारत, भूटान, बांग्लादेश, नेपाळ, मालदीव आणि श्रीलंका ही सार्कची सदस्य-राष्ट्रे आहेत.

(३) १९९३ साली दक्षिण आशियाई प्राधान्य व्यापारी करार SAPTA करण्यात आला. २००६ साली त्याचे रूपांतर दक्षिण आशिया मुक्त व्यापार क्षेत्रात (SAFTA) करण्यात आले.

**(ब) बीम्सटेक :** (१) 'बे ऑफ बंगाल इनिशिएटिव्ह फॉर मल्टी सेक्टर टेक्निकल अँड इकॉनॉमिक को-ऑपरेशन' म्हणजेच बीम्सटेकची स्थापना १९९७ मध्ये झाली.

(२) बीमस्टेक मध्ये बांगलादेश, भूटान, भारत, नेपाळ, श्रीलंका, म्यानमार आणि थायलंड यांचा समावेश आहे.

(३) बीम्सटेक दक्षिण आशिया आणि आग्नेय आशिया या दोन प्रदेशांना जोडणारा दुवा आहे. आर्थिक विकासाला चालना देणे, हे बीम्सटेकचे प्रमुख कार्य आहे.

**(क) ब्रिक्स :** (१) ही संघटना २००९ साली ब्राझील, रशिया, भारत आणि चीन या उदयोन्मुख अर्थव्यवस्था असलेल्या देशांच्या पुढाकाराने आकारास आली. २०१० मध्ये त्यात दक्षिण आफ्रिकेचा समावेश करण्यात आला.

(२) नवीन औद्योगिक मोठ्या व वेगाने वाढणाऱ्या या अर्थव्यवस्थांचा प्रादेशिक आणि जागतिक घडामोडींवर बऱ्यापैकी प्रभाव असतो.

(३) ब्रिक्सचे सर्व सहभागी देश हे जी-२० चे सदस्य आहेत.

**(ड) शांघाय सहकार्य संघटना :** (१) २००१ मध्ये चीन, रशिया तसेच कझाकस्तान, किरगिझस्तान, ताजिकिस्तान आणि उझबेकिस्तान या रशियालगतच्या देशांनी एकत्र येऊन SCO संघटनेचे गठन केले. पुढे २०१६ साली भारत आणि पाकिस्तान या संघटनेचे सदस्य झाले.

(२) राजकीय संवाद व आर्थिक सहकार्य यांद्वारे शांतता व स्थैर्य राखणे हे या संघटनेचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

(३) याव्यतिरिक्त व्यापार, संशोधन आणि तंत्रज्ञान या क्षेत्रांमध्ये सहकार्याला ही संघटना चालना देते.

**(ई) जी-२० :** (१) युरोपियन युनियन आणि १९ इतर राष्ट्रांची सरकारे आणि मध्यवर्ती बँकांचे गव्हर्नर यांचे १९९९ मध्ये जी-२० नावाने आंतरराष्ट्रीय व्यासपीठ तयार करण्यात आले.

(२) त्याचा मुख्य उद्देश हा आर्थिक स्थैर्याबाबत चर्चा करणे हा होय.

(३) विकसित आणि विकसनशील राष्ट्रांच्या दरम्यान चर्चा होण्यासाठी हे एक व्यासपीठ आहे. भारताने जी-२० मध्ये सातत्याने सक्रिय सहभाग घेतला आहे.

**उपक्रम**

- भारताचा ब्रिक्समधील सहभाग कोणता ते शोधा.

# २ १९९१ नंतरच्या महत्त्वाच्या संकल्पना आणि समस्या : जागतिकीकरण

**अध्ययनघटक :**

- जागतिकीकरण म्हणजे काय?
- जागतिकीकरणाचे घटक
- जागतिकीकरणाचे परिणाम

## महत्त्वाच्या संकल्पना

(१) **जागतिकीकरण :** राष्ट्रीय अर्थव्यवस्थेस जागतिक अर्थव्यवस्थेशी संलग्न करणे, जगातील देशांचे परस्परावलंबन वाढणे आणि भांडवल, वस्तू, सेवा आणि मनुष्यबळाचा जगभर अनिर्बंध संचार असणे.

(२) **बहुराष्ट्रीय कंपनी :** अशी कंपनी असते जिचे एका राष्ट्रात मुख्यालय असते, परंतु ती अनेक देशांत कार्यरत असते.

(३) **ट्रान्स-नॅशनल कॉर्पोरेशन :** या बहुराष्ट्रीय कंपन्यांचाच एक प्रकार आहेत. या कंपन्या कोणत्याही एका राष्ट्राला बांधील नसतात. त्यांचे एकाच राष्ट्रात मूळ स्थान नसते.

(४) **सेवा क्षेत्र :** हे तीन पारंपरिक आर्थिक क्षेत्रांपैकी तिसरे आहे. सेवा क्षेत्रामध्ये खानपान, हाऊस कीपींग, सुरक्षा इत्यादी सेवांचा समावेश होतो.

(५) **General Agreement on Trade in Services (GATS) :** १९९५ मध्ये जागतिक व्यापार संघटनेअंतर्गत (WTO) हा करार केला गेला. वस्तूंबाबत बहुपक्षीय पातळीवर व्यापाराचे नियोजन गॅटमार्फत केले जात असे. त्याच प्रकारे नियोजन करण्यासाठी सेवा क्षेत्राला यात समाविष्ट केले गेले.

(६) **बौद्धिक संपदेच्या अधिकाराबाबतचा व्यापारी करार Trade Related Aspects of Intellectual Property Rights, (TRIPs) :** जागतिक व्यापार संघटनेच्या सदस्यांसाठी बौद्धिक संपदेच्या अधिकाराबाबत काही न्यूनतम निकष त्या कराराद्वारे केले गेले आहेत.

(७) **बौद्धिक संपदा :** कॉपीराईट, भौगोलिक संकेत, औद्योगिक डिझाईन, पेटंट, ट्रेडमार्क इत्यादींचा समावेश बौद्धिक संपदेत करण्यात येतो.

## महत्त्वाचे मुद्दे

### २.० प्रास्ताविक :

जागतिकीकरण ही संकल्पना १९९०च्या दशकाच्या प्रारंभी व्यापक प्रमाणात उपयोगात आली. त्यात १९९० नंतरच्या कालखंडातील राजकीय, सामाजिक, आर्थिक, वैचारिक व तांत्रिक बदलांचा समावेश होतो.

### २.१ जागतिकीकरण म्हणजे काय?

देशाच्या भौगोलिक सीमाक्षेत्राबाहेर होणारा आर्थिक प्रक्रियांचा विकास आणि विस्तार, म्हणजे 'जागतिकीकरण' होय. या प्रक्रियेच्या अंतर्गत जगातील विविध देशांमधील संलग्नता आणि परस्परावलंबन यांत वाढ होते. या प्रक्रियेत देशाच्या सीमाक्षेत्राबाहेर भांडवल, वस्तू, उद्योजक, व्यावसायिक आणि मनुष्यबळ यांचा मुक्त संचार होणे अपेक्षित आहे. राष्ट्रीय अर्थव्यवस्थेचे जागतिक अर्थव्यवस्थेत परिवर्तन होण्याच्या प्रक्रियेला 'जागतिकीकरण' म्हणतात. या प्रक्रियेत मुक्त व्यापार अभिप्रेत असल्यामुळे, आयातनिर्यात निर्बंध कमी होणे अपेक्षित आहे.

जागतिकीकरणाने राष्ट्र आणि राष्ट्रातील लोक एकमेकांशी जोडले आहेत. जगात एखाद्या ठिकाणी होणाऱ्या घटनांचा दुसरीकडे प्रभाव पडताना दिसून येतो.

या बदलांकडे पाहण्याचे अनेक दृष्टिकोन आहेत. (अ) एक मत असे आहे, की जरी आपण जागतिक पातळीवर एकमेकांशी जोडले गेलो असलो, तरी 'राष्ट्र' व्यवस्थेचे महत्त्व कमी झालेले नाही. (ब) दुसऱ्या मतानुसार, तंत्रज्ञान आणि अर्थशास्त्राने राष्ट्रांना एकमेकांच्या जवळ आणले आहे. राष्ट्राचे सार्वभौमत्व आणि अधिकार क्षेत्राच्या संकल्पनांना आज आव्हान दिले जात आहे. नागरी समाज आणि बिगर राजकीय अभिकर्ते महत्त्वाचे झाले आहेत. आज सामाजिक चळवळी राष्ट्रांच्या सीमा छेदून आंतरराष्ट्रीय पातळीवर कार्य करतात.

## २.२ जागतिकीकरणामुळे आर्थिक क्षेत्रावर घडून आलेले परिणाम :

**(१) भांडवली गुंतवणुकीचा मुक्त संचार :** उद्योगांमध्ये भांडवली गुंतवणूक ही केवळ सरकारी पातळीवरच नव्हे तर खासगी क्षेत्रांतूनदेखील होत असते. टाटा किंवा रिलायन्ससारख्या खासगी कंपन्या भारतातच नव्हे तर अमेरिका, युरोप आणि आफ्रिका खंडातील राष्ट्रांतदेखील गुंतवणूक करतात. ONGC सारख्या सरकारी कंपन्या परदेशात गुंतवणूक करतात. अनेक परदेशी कंपन्या भारतात गुंतवणूक करीत आहेत. ही गुंतवणूक पायाभूत सुविधा तसेच ग्राहकोपयोगी अशा दोन्ही क्षेत्रांत होताना दिसून येते.

१९९१ च्या आर्थिक सुधारणा होण्याआधी अशा प्रकारची गुंतवणूक क्वचित होत असे, कारण त्यात सरकारी नियमांचे अडथळे होते. ते अडथळे आता दूर झाले आहेत. हा बदल म्हणजे भांडवली गुंतवणुकीचा मुक्त संचार आहे.

**(२) 'व्यापार' या संकल्पनेत झालेले बदल :** जागतिकीकरणामुळे 'व्यापार' या संकल्पनेत घडून आलेले उल्लेखनीय बदल पुढीलप्रमाणे : (अ) १९९५ साली जागतिक व्यापार संघटना (World Trade Organization – WTO) ची निर्मिती करण्यात आली. आयातीवरील सीमा शुल्क आणि इतर कर रद्द करून जागतिक पातळीवर व्यापार मुक्त करण्यासाठी राष्ट्रांना प्रोत्साहन देण्याचे कार्य ही संघटना करते. आंतरराष्ट्रीय व्यापारासंबंधी असलेल्या नियमांचे पालन सदस्य राष्ट्रांनी करावे यासाठी ती प्रयत्नशील असते. देशांदरम्यानचे व्यापारासंबंधीचे विवाद सोडवते आणि देशादेशांतील व्यापारविषयक बोलणी घडवून आणते. (ब) जागतिकीकरणाच्या कालखंडात 'व्यापार' या संकल्पनेत सेवाक्षेत्राची भर घातली गेली. बँक, विमा इत्यादी सेवा व्यापारात समाविष्ट करण्यात आल्या. त्याच्यापुढे जाऊन बौद्धिक संपदेचा व्यापारही करण्यात येतो. (क) व्यापार कंटेनर कार्गोद्वारा – मोठी जहाजे प्रचंड प्रमाणात मालाची वाहतूक करतात. त्यांच्यासाठी विशेष बंदरे उभारली जातात. त्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापाराकडे बघण्याच्या दृष्टिकोनात आमूलाग्र बदल घडून आला आहे.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

**(१) General Agreement on Trade in Service (GATS) :** १९९५ मध्ये जागतिक व्यापार संघटनेअंतर्गत (WTO) हा करार केला गेला. वस्तूंबाबत बहुपक्षीय पातळीवर व्यापाराचे नियोजन गॅटमार्फत केले जात असे. त्याचप्रकारे नियोजन करण्यासाठी सेवा क्षेत्राला यात समाविष्ट केले गेले.

**(२) बौद्धिक संपदेच्या अधिकाराबाबतचा व्यापारी करार [Trade Related Aspects of Intellectual Property Rights, (TRIPs)] :** जागतिक व्यापार संघटनेच्या सदस्यांसाठी बौद्धिक संपदेच्या अधिकाराबाबत काही न्यूनतम निकष त्या कराराद्वारे केले गेले आहेत.

TRIPs मध्ये साधारणतः कॉपीराईट, भौगोलिक संकेत या गोष्टीचा समावेश होतो. औद्योगिक डिझाईन, इंटिग्रेटेड सर्कीट, पेटंट, ट्रेडमार्क इत्यादींचा समावेश होतो. बौद्धिक संपदा अधिकारांची अंमलबजावणी करण्याची प्रक्रिया, उपाययोजना आणि विवाद निवारण या गोष्टीदेखील TRIPs मध्ये सांगितल्या आहेत.

**(३) ट्रान्स-नॅशनल कंपन्यांचा उदय :** १९९० च्या दशकापर्यंत आर्थिक क्षेत्रावर सरकारी नियंत्रण होते. जागतिकीकरणाच्या युगात खासगी उद्योगांमध्ये वाढ झालेली दिसून येते. ज्या खासगी कंपन्या देशांतर्गत कार्य करीत होत्या. त्या आता अन्य देशांत व्यापार करतात. त्यांचे रूपांतर बहुराष्ट्रीय आणि ट्रान्स-नॅशनल कंपन्यांमध्ये झाले.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

**बहुराष्ट्रीय कंपनी** अशी कंपनी असते जिचे एका राष्ट्रात मुख्यालय असते, परंतु ती अनेक देशांत कार्यरत असते. काही भारतीय बहुराष्ट्रीय कंपन्या : बजाज, डाबर, ONGC, आदित्य बिर्ला, अमूल, गोदरेज, विप्रो इत्यादी.

**ट्रान्स-नॅशनल कॉर्पोरेशन** या बहुराष्ट्रीय कंपन्यांचाच एक प्रकार आहेत. या कंपन्या कोणत्याही एका राष्ट्राला बांधील नसतात. त्यांचे एकाच राष्ट्रात मूळ स्थान नसते. काही ट्रान्स-नॅशनल कंपन्या : नेसले, बायर, युनिलीव्हर, सीमेन्स, जनरल इलेक्ट्रिक इत्यादी.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

**सेवा क्षेत्र** हे तीन पारंपरिक आर्थिक क्षेत्रांपैकी तिसरे आहे. पहिल्या क्षेत्रात शेती, खाणकाम, मासेमारी इत्यादींचा समावेश होतो. दुसरे क्षेत्र हे उत्पादन क्षेत्र आहे. सेवा क्षेत्रामध्ये खानपान, हाऊस कीपींग, सुरक्षा इत्यादी सेवांचा समावेश होतो.

**(४) आर्थिक बदलाचे सर्वसामान्य लोकांवर झालेले परिणाम :**

(१) देशातील कुशल आणि अर्धकुशल कामगार आज पश्चिम आशिया, अमेरिका, युरोप इत्यादी ठिकाणी काम करीत आहेत. खासगी क्षेत्राच्या वाढीमुळे सेवा क्षेत्रात रोजगाराच्या संधी वाढल्या आहेत.

(२) लहान उद्योगांना बड्या बहुराष्ट्रीय कंपन्यांशी स्पर्धा करावी लागते. जे उद्योग कार्यक्षम पद्धतीने कार्य करतात, ते स्पर्धेत टिकून आहेत. आज शहरात मॉल्स जरी उभे राहिले असले तरीदेखील छोटे दुकानदार ग्राहकांना आवश्यक सेवा देतात.

(३) आज शेतकरी आपला माल मध्यस्थाशिवाय मोठ्या कंपन्यांना थेट विकू शकतात. बहुराष्ट्रीय कंपन्यांनी नवीन तंत्रज्ञान आणले आहे. तसेच भारतीय मालाला नव्या बाजारपेठा खुल्या केल्या आहेत. भारतातील कृषी उत्पादनांची मोठ्या प्रमाणात निर्यात होत आहे.

## २.३ जागतिकीकरणाचे राजकीय क्षेत्रावर घडून आलेले परिणाम :

**(१) लोकशाही शासनाचे वाढते महत्त्व :** जागतिकीकरणाच्या कालखंडात जग लोकशाही व्यवस्थेच्या दिशेने वाटचाल करीत आहे असे मानले जाते. 'सहभागी राज्य', 'नागरिक केंद्रित शासन' आणि 'सुशासन' या संकल्पनांना सार्वत्रिक स्वीकृती मिळत आहे. सहभागी शासनव्यवस्थेत समाजातील सर्व घटकांना निर्णय प्रक्रियेत कसे सामील करता येईल हे बघितले जाते. नागरिक केंद्रित शासन आणि सुशासन व्यवस्थेत नागरी समाजाच्या सहभागावर भर दिला जातो.

**(२) राज्याचे स्थान :** जागतिकीकरणाच्या कालखंडात असा समज आहे की, आता राज्याचे महत्त्व कमी होत चालले आहे. सार्वभौमत्व हा राज्याचा एक महत्त्वाचा घटक आहे. या घटकावर आज अंतर्गत तसेच बाह्य घटकांकडून आघात होत आहेत. आंतरराष्ट्रीय कायद्याचा विस्तार, प्रादेशिक आर्थिक संघटना, बाजारपेठेचे जागतिकीकरण, पर्यावरण आणि मानवी प्रश्नांबाबतची वाढती चिंता ही सर्व बाह्य आव्हाने आहेत. राष्ट्रीय पातळीवरील सहमतीचा अभाव, वाढता वांशिक राष्ट्रवाद, बिगर राजकीय अभिव्यक्तीचा वाढता प्रभाव आणि पर्यावरण, लिंगभेद आणि मानवतावादी समस्यांना प्राप्त होणारे महत्त्व ही काही अंतर्गत आव्हाने आहेत.

**(३) बिगर राजकीय घटकांचे स्थान :** नागरी समाजाच्या वाढत्या महत्त्वामुळे बिगर राजकीय घटकांचे महत्त्व वाढत आहे. स्वयंसेवी संघटना आणि बिगर सरकारी संस्थांना महत्त्व प्राप्त झाले आहे. ॲमनेस्टी इंटरनॅशनल, ग्रीन पीस मूव्हमेंटसारख्या आंतरराष्ट्रीय स्वयंसेवी संघटनांप्रमाणेच दहशतवादी गट या बिगर राजकीय घटकाचे महत्त्व वाढत चालले आहे.

**(४) मानवी हक्क :** जागतिकीकरणाच्या युगात मानवाधिकारांचे संरक्षण एक महत्त्वाचा विषय बनला आहे. तिसऱ्या जगाच्या दृष्टीने नागरी आणि राजकीय हक्कांच्या आधी आर्थिक विकास साधण्याची गरज असते. तसेच वैयक्तिक अधिकारांपेक्षा समाज आणि कुटुंब यांचे महत्त्व अधिक आहे.

**(५) विचारप्रणाली :** जागतिकीकरणाच्या युगात बाजारपेठीय अर्थव्यवस्था विचारप्रणाली सार्वत्रिकरीत्या स्वीकारण्यात आली असली, तरी सर्वच राष्ट्र एकाच प्रकारच्या बाजारपेठीय अर्थव्यवस्थेचा अवलंब करीत नाहीत. त्या बाजारपेठीय अर्थव्यवस्थेचे स्वरूप त्या राज्याच्या विचारप्रणालीवर अवलंबून असते. अमेरिकेत भांडवलशाही विचारप्रणालीबरोबर भांडवलशाही अर्थव्यवस्था आहे. म्हणून त्याचे वर्णन हे 'भांडवलशाही बाजारपेठीय व्यवस्था' असे केले जाते. पश्चिम युरोपीय राज्यांमध्ये कल्याणकारी विचारसरणी आहे म्हणून त्याचे वर्णन हे 'कल्याणकारी बाजारपेठीय अर्थव्यवस्था' असे केले जाते. चिनी राजकीय व्यवस्था ही साम्यवादी विचारप्रणाली मानते, परंतु चीनच्या अर्थव्यवस्थेत बदल झाल्याने चीनचे वर्णन हे 'साम्यवादी बाजारपेठीय अर्थव्यवस्था' असे केले जाते. भारतात आपण त्यास 'आर्थिक उदारीकरण' असे म्हणतो.

## २.४ तंत्रज्ञानावरील परिणाम :

(१) जागतिक संप्रेषणाच्या पद्धतीत आमूलाग्र बदल झाला. उपग्रह संप्रेषण प्रणाली, मोबाइल, टेलिफोन, फॅक्स, इंटरनेट इत्यादींनी जनतेच्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक जीवनात क्रांतिकारी बदल घडवून आणले.

(२) सन १९९० पर्यंत भारतात दूरदर्शन हे एकमेव प्रसारमाध्यम होते. १९९० मध्ये CNN ने भारतात प्रवेश केला. त्यानंतर भारतात असंख्य Channels सुरू झाली. उपग्रह संप्रेषण प्रणालीमुळे 'डीश ॲंटिना'च्या साहाय्याने भारतात सर्वत्र कोणतेही कार्यक्रम बघणे शक्य झाले.

(३) आज मोबाइलचा सर्वत्र वापर होताना दिसून येतो. मोबाइल फोन हे सरकारी तसेच खासगी कंपन्यांमार्फत उपलब्ध आहेत.

(४) इंटरनेट तंत्रज्ञानातील सर्वांत महत्त्वाची क्रांती होय. यामुळे विचार, संस्कृती आणि माहितीचा जगात प्रसार करणे शक्य झाले आहे. इंटरनेटच्या 'सर्च इंजिन'च्या माध्यमातून आपल्याला माहिती गोळा करता येते. तसेच 'ट्विटर', 'स्काईप', 'फेसबुक', 'इन्स्टाग्राम', 'व्हॉटस् ॲप'च्या माध्यमातून सोशल 'नेटवर्किंग' ची सोय उपलब्ध झाली आहे.

(५) माहितीच्या युगातील तंत्रज्ञान आंतरराष्ट्रीय स्वरूपाचे असल्याने कोणत्याही देशांच्या सीमांना बांधील नसते. यामुळेच सीमापार गट, संस्था आणि दहशतवादी संघटना यांच्या वाढीस मदत होते. अशा सीमापार गटांवर नियंत्रण ठेवणे किंवा त्यांच्या कार्यावर मर्यादा आणणे हे राज्यांना अवघड जाते.

**माहीत आहे का तुम्हांला?**

इजिप्तमधील 'अरब स्प्रिंग' या क्रांतीला 'फेसबुक क्रांती' असे संबोधित करतात.

## २.५ सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रावरील परिणाम :

(१) जागतिक पातळीवर प्रसारमाध्यमात झालेली क्रांती आणि इंटरनेटच्या सेवेची उपलब्धता यांमुळे लोकांना जगात काय घडत आहे हे जाणून घेणे शक्य झाले आहे. याचबरोबर लोकांचे देशांतर्गत आणि देशाबाहेरचे भ्रमण याचा समाज आणि संस्कृतीवर परिणाम झालेला दिसून येतो.

(२) आज आपल्याला 'वैश्विक कॉस्मॉपॉलिटन संस्कृतीचा' उदय होताना दिसत आहे. त्यामुळे आधुनिकीकरण, पाश्चात्त्यीकरण, सेक्युलरायझेशन ही मूल्ये पारंपरिक मूल्यांपेक्षा महत्त्वाची वाटू लागली आहेत.

(३) लोकांच्या वैयक्तिक जीवनावर याचा प्रभाव दिसून येतो. खाण्यापिण्याच्या सवयीमध्ये बदल झाल्याचे दिसून येते. सण साजरे करण्याच्या पद्धतीत पाश्चिमात्य प्रभाव दिसून येतो. 'मदर्स डे', 'फादर्स डे', 'फ्रेंडशिप डे' सारख्या नवीन कल्पना पुढे येतात. तसेच 'वेस्टर्न' पद्धतीचे कपडे घालण्याचा कल वाढलेला दिसतो.

(४) पारंपरिक कुटुंब पद्धतीत बदल झाला आहे. समाजात वाढत चाललेला व्यक्तिवाद आणि चंगळवाद/भौतिकवाद हा जागतिक संस्कृतीचा परिणाम आहे.

## २.६ जागतिकीकरणाचे सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम :

**(अ) सकारात्मक :** (१) रोजगार आणि व्यवसायाच्या नवीन संधी तरुणांना उपलब्ध होणे. (२) खासगी क्षेत्रात अधिक रोजगार निर्मिती होत आहे.

**(ब) नकारात्मक :** (१) राज्याच्या कल्याणकारी योजना थांबण्याची शक्यता. (२) स्थानिक उद्योगधंदे नष्ट होण्याचा धोका. (३) सामान्य शेतकरी बहुराष्ट्रीय कंपन्यांशी स्पर्धा करू शकत नाही.

## प्रश्नोत्तरे

**प्र. १ दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा :** *(प्रत्येकी १ गुण)*

**[ १ ]**

*(१) जागतिकीकरणाच्या युगात आर्थिक क्षेत्रात पुढील महत्त्वाचे बदल झाले.

(i) भांडवल गुंतवणुकीचा मुक्त संचार
(ii) गॅटची निर्मिती
(iii) ट्रान्स-नॅशनल कंपनीचा उदय
(iv) बौद्धिक संपदा हक्कावर लक्ष केंद्रित

*(अ) फक्त i, ii आणि iii बरोबर आहेत.*
*(ब) फक्त i, ii आणि iv बरोबर आहेत.*
*(क) फक्त i, iii आणि iv बरोबर आहेत.*
*(ड) सर्व बरोबर आहेत.*

*(२) 'साम्यवादी बाजारपेठीय अर्थव्यवस्था' ही संकल्पना --------- या देशासंदर्भात वापरली जाते.

*(अ) भारत (ब) चीन (क) फ्रान्स (ड) अमेरिका*

(३) --------- आणि अर्थशास्त्राने राष्ट्रांना एकमेकांजवळ आणले आहे.

*(अ) मानवतावाद (ब) आंतरराष्ट्रीय संघटना*
*(क) तंत्रज्ञान (ड) राजकारण*

(४) परस्परांशी जोडलेली जागतिक व्यवस्था म्हणजे --------- होय.

*(अ) जागतिकीकरण (ब) संयुक्त राष्ट्रे*
*(क) उदारीकरण (ड) खाजगीकरण*

(५) भांडवली गुंतवणुकीतून --------- उभारणी करता येते.

*(अ) राष्ट्राची (ब) समाजाची*
*(क) उद्योगांची (ड) दुर्बल घटकांची*

**उत्तरे :**

(१) (क) फक्त i, iii आणि iv बरोबर आहेत.

(२) 'साम्यवादी बाजारपेठीय अर्थव्यवस्था' ही संकल्पना चीन या देशासंदर्भात वापरली जाते.

(३) तंत्रज्ञान आणि अर्थशास्त्राने राष्ट्रांना एकमेकांजवळ आणले आहे.

(४) परस्परांशी जोडलेली जागतिक व्यवस्था म्हणजे जागतिकीकरण होय.

(५) भांडवली गुंतवणुकीतून उद्योगांची उभारणी करता येते.

**[ २ ]**

(१) --------- सारख्या सरकारी कंपन्या परदेशांत गुंतवणूक करतात.

*(अ) BHEL (ब) ONGC*
*(क) BPCL (ड) Coal Indin*

(२) मॅक्डोनाल्डसारख्या परकीय कंपन्या --------- क्षेत्रात गुंतवणूक करतात.

*(अ) शिक्षण (ब) आरोग्य*

*(क) ग्राहकोपयोगी (ड) कारखानदारी*

(३) भांडवल गुंतवणुकीवरील सरकारी नियमांचे अडथळे दूर करणे म्हणजे ---------

*(अ) भांडवल गुंतवणुकीची मुभा*

*(ब) भांडवल गुंतवणुकीस परवानगी*

*(क) भांडवली गुंतवणुकीचा मुक्त संचार*

*(ड) जागतिकीकरण*

(४) --------- पासून आंतरराष्ट्रीय व्यापारांबाबतचे नियम हे GATT च्या अंतर्गत आणले जात होते.

*(अ) १९४५ (ब) १९४८ (क) १९९२ (ड) १९९५*

(५) GATT च्या जागी जागतिक व्यापार संघटनेची निर्मिती --------- मध्ये करण्यात आली.

*(अ) १९४८ (ब) १९९१ (क) १९९२ (ड) १९९५*

**उत्तरे :**

(१) ONGC सारख्या सरकारी कंपन्या परदेशांत गुंतवणूक करतात.

(२) मॅक्डोनाल्डसारख्या परकीय कंपन्या ग्राहकोपयोगी क्षेत्रात गुंतवणूक करतात.

(३) भांडवल गुंतवणुकीवरील सरकारी नियमांचे अडथळे दूर करणे म्हणजे भांडवल गुंतवणुकीचा मुक्त संचार.

(४) १९४८ पासून आंतरराष्ट्रीय व्यापारांबाबतचे नियम हे GATT च्या अंतर्गत आणले जात होते.

(५) GATT च्या जागी जागतिक व्यापार संघटनेची निर्मिती १९९५ मध्ये करण्यात आली.

**[ ३ ]**

(१) 'बाजारपेठीय अर्थव्यवस्था' ही संकल्पना --------- देशाच्या संदर्भात वापरली जाते.

*(अ) अमेरिका (ब) रशिया (क) चीन (ड) भारत*

(२) 'कल्याणकारी बाजारपेठीय अर्थव्यवस्था' ही संकल्पना --------- देशांच्या संदर्भात वापरली आहे.

*(अ) अमेरिकेतील (ब) पश्चिम युरोपातील*

*(क) साम्यवादी (ड) विकसनशील*

(३) 'आर्थिक उदारीकरण' ही संकल्पना --------- या देशाच्या संदर्भात वापरली जाते.

*(अ) अमेरिका (ब) भारत (क) चीन (ड) फ्रांस*

(४) टाटा जॅग्वार लँड रोव्हरचा कारखाना --------- या देशात आहे.

*(अ) भारत (ब) अमेरिका*

*(क) युनायटेड किंग्डम (ड) फ्रांस*

(५) --------- ही ट्रान्स-नॅशनल कॉर्पोरेशन आहे.

*(अ) ONGC (ब) युनिलिव्हर (क) फॉर्ड (ड) टोयाटो*

**उत्तरे :**

(१) 'बाजारपेठीय अर्थव्यवस्था' ही संकल्पना अमेरिका या देशाच्या संदर्भात वापरली जाते.

(२) 'कल्याणकारी बाजारपेठीय अर्थव्यवस्था' ही संकल्पना पश्चिम युरोपातील देशांच्या संदर्भात वापरली आहे.

(३) 'आर्थिक उदारीकरण' ही संकल्पना भारत या देशाच्या संदर्भात वापरली जाते.

(४) टाटा जॅग्वार लँड रोव्हरचा कारखाना युनायटेड किंग्डम या देशात आहे.

(५) युनिलिव्हर ही ट्रान्स-नॅशनल कॉर्पोरेशन आहे.

**प्र. २ पुढीलपैकी प्रत्येक गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा : *(प्रत्येकी १ गुण)***

**(१)** (अ) शेती व खाणकाम – पहिले क्षेत्र

(ब) उत्पादन – दुसरे क्षेत्र

(क) अन्नधान्याची निर्यात – पहिले क्षेत्र

(ड) आरोग्य व शिक्षण – तिसरे क्षेत्र.

**(२)** (अ) भारतीय बहुराष्ट्रीय कंपनी – विप्रो

(ब) ट्रान्स-नॅशनल कंपनी – ONGC

(क) ट्रान्स-नॅशनल कंपनी – जनरल इलेक्ट्रिकल

(ड) अमेरिकन बहुराष्ट्रीय कंपनी – मॅक्डोनाल्ड.

**उत्तरे : दुरुस्त जोड्या –**

**(१)** (क) अन्नधान्याची निर्यात – तिसरे क्षेत्र

**(२)** (ब) ट्रान्स-नॅशनल कंपनी – नेसले.

**प्र. ३ दिलेल्या पर्यायांपैकी योग्य कारण निवडून विधाने पूर्ण करा : *(प्रत्येकी १ गुण)***

(१) युनिलिव्हर ही एक ट्रान्स-नॅशनल कंपनी आहे; कारण ---------

*(अ) ती अनेक देशांत कार्यरत आहे.*

*(ब) ती कोणत्याही एका राष्ट्राला बांधील नाही.*

*(क) ती सेवा क्षेत्रात कार्य करते.*

(२) राज्याचे महत्त्व आता कमी होत चालले आहे; कारण ---------

*(अ) राज्याचा कायदे करण्याचा अधिकार कमी झाला आहे.*

*(ब) राजकीय पक्ष वर्चस्व गाजवतात.*

*(क) आंतरजालमुळे राज्यांच्या भौगोलिक सीमा पुसट झाल्या आहेत.*

**उत्तरे :** (१) युनिलिव्हर ही एक ट्रान्स-नॅशनल कंपनी आहे; कारण ती कोणत्याही एका राष्ट्राला बांधील नाही.

(२) राज्याचे महत्त्व आता कमी होत चालले आहे; कारण आंतरजालमुळे राज्यांच्या भौगोलिक सीमा पुसट झाल्या आहेत.

### प्र. ४ दिलेल्या विधानांसाठी समर्पक संकल्पना लिहा : *(प्रत्येकी १ गुण)*

*(१) आंतरराष्ट्रीय व्यापारासंबंधी एकमेव आंतरराष्ट्रीय संघटना –

*(२) अनेक देशांत कार्यरत असलेली कंपनी –

(३) वस्तू आणि सेवाविषयीचा १९९५ सालचा बहुराष्ट्रीय करार –

(४) बौद्धिक संपदेच्या अधिकाराविषयीचा करार –

(५) कोणत्याही एका राष्ट्राशी बांधील नसलेले व्यापार संघटन –

**उत्तरे :** (१) World Trade Organization

(२) बहुराष्ट्रीय कंपनी

(३) General Agreement on Trade in Services (GATS)

(४) Trade Related Aspects of Intellectual Property Rights (TRIPs)

(५) Trans - National Corporation.

### प्र. ५ गटात न बसणारा शब्द ओळखा व लिहा : *(प्रत्येकी १ गुण)*

*(१) मोबाइल, सॅटेलाइट, इंटरनेट, ग्रामोफोन

(२) GATT, GATS, TRIPs, WTO

(३) पेटंट, ट्रेडमार्क, कॉपीराईट, शिक्षण

(४) सामाजिक चळवळी, बिगर राजकीय अभिकर्ते, नागरी समाज, राजकीय पक्ष

(५) टाटा, रिलायन्स, ONGC, बजाज.

**उत्तरे :**

(१) ग्रामोफोन (जागतिकीकरणाशी संबंध नाही)

(२) GATT (जागतिकीकरणाच्या आधीचा व्यापार करार)


(३) शिक्षण (बौद्धिक संपदेत समाविष्ट नाही)

(४) राजकीय पक्ष (पक्षबाह्य राजकारणाशी निगडित नाही)


(५) बजाज (या उद्योग समूहाने परदेशात गुंतवणूक केलेली नाही).

### प्र. ६ पुढील संकल्पना चित्रे पूर्ण करा : *(प्रत्येक मुद्द्यासाठी १ गुण)*


**(१) राज्यासमोर असलेली आव्हाने (अंतर्गत) :**





**उत्तर : राज्यासमोर असलेली आव्हाने (अंतर्गत) :**




**(२) राज्यासमोर असलेली आव्हाने (बहिर्गत) :**




**उत्तर : राज्यासमोर असलेली आव्हाने (बहिर्गत) :**




### प्र. ७ पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण लिहा : *(प्रत्येकी २ गुण)*

***(१) जागतिकीकरणाने बाजारपेठीय अर्थव्यवस्था ही संकल्पना आणली.**

**उत्तर :** वरील विधान **चूक** आहे.

**कारणे :** (१) बाजारपेठीय अर्थव्यवस्थेचे स्वरूप त्या राज्याच्या विचारप्रणालीवर अवलंबून असे.

(२) ज्यास अमेरिकेत बाजारपेठीय अर्थव्यवस्था म्हणतात, त्यास आर्थिक उदारीकरण ही संज्ञा भारतात वापरली जाते.

***(२) जागतिकीकरणात बिगर सरकारी संस्थांचे महत्त्व कमी झाले आहे.**

**उत्तर :** वरील विधान **चूक** आहे.

**कारण :** जागतिक स्तरावर बिगर सरकारी संस्थांचे महत्त्व वाढले आहे.

**(३) राजकीय आणि आर्थिक बदलाचा परिणाम सामाजिक व सांस्कृतिक घटकांवर होतो.**

**उत्तर :** वरील विधान **बरोबर** आहे.

**कारणे :** (१) जागतिकीकरण या राजकीय व आर्थिक प्रक्रियेमुळे आपले सामाजिक व सांस्कृतिक जीवन प्रभावित झाले आहे.

(२) आपल्या खानपानच्या सवयी, वेशभूषा व कुटुंबव्यवस्था यांच्यावर त्यांचा प्रभाव पडला आहे.

**(४) भांडवल गुंतवणूक हा अर्थव्यवस्थेचा सर्वांत महत्त्वाचा घटक आहे.**

**उत्तर :** वरील विधान **बरोबर** आहे.

**कारणे :** (१) उद्योगधंद्यांना भांडवलाची गरज असते. भांडवली गुंतवणुकीतून उद्योगांची उभारणी करता येते.

(२) रस्ते, रेल्वे, जलमार्ग, हवाई मार्ग या संपर्क साधनांचा विकास करण्यासाठी भांडवली गुंतवणूक आवश्यक असते.

**(५) भांडवल गुंतवणुकीचा प्रवाह एकमार्गी असतो.**

**उत्तर :** वरील विधान **चूक** आहे.

**कारणे :** (१) विदेशी कंपन्या भारतात भांडवल गुंतवणूक करतात.

(२) त्याचप्रमाणे टाटा, रिलायन्ससारख्या भारतीय कंपन्या अमेरिका, युरोप आणि आफ्रिका खंडातील देशांत भांडवल गुंतवणूक करतात.

**(६) जागतिक व्यापार संघटनेची स्थापना ही आंतरराष्ट्रीय व्यापार क्षेत्रातील महत्त्वाची घटना आहे.**

**उत्तर :** वरील विधान **बरोबर** आहे.

**कारणे :** (१) १९४८ पासून आंतरराष्ट्रीय व्यापार GATT च्या नियमानुसार होत असे.

(२) GATT हा करार होता, संघटना नव्हती.

(३) ही त्रुटी १९९५ साली जागतिक व्यापार संघटनेच्या स्थापनेद्वारा दूर करण्यात आली.

**(७) जागतिकीकरण छोट्या शेतकऱ्यांसाठी फलदायी नाही.**

**उत्तर :** वरील विधान **बरोबर** आहे.

**कारण :** छोटे शेतकरी मोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांशी स्पर्धा करू शकत नाही.

**(८) शहरातील मॉल्सच्या स्पर्धेत छोट्या दुकानदारांचा टिकाव लागत नाही.**

**उत्तर :** वरील विधान **चूक** आहे.

**कारण :** ते आपल्या ग्राहकांना आवश्यक सेवा देतात.

**(९) भारतातील सहकारी चळवळ बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या वर्चस्वाला उत्तर असू शकते.**

**उत्तर :** वरील विधान **बरोबर** आहे.

**कारण :** सहकारी चळवळीचे तत्त्वज्ञान त्यात मागील सभासदांचे सक्षमीकरण करणे आणि त्यांना वित्तीय आधार देणे हे आहे.

**(१०) भारताच्या विकासासाठी ग्राहकोपयोगी क्षेत्रात परदेशी भांडवली गुंतवणूक आवश्यक आहे.**

**उत्तर :** वरील विधान **चूक** आहे.

**कारण :** भारताच्या आर्थिक विकासासाठी ग्राहकोपयोगी क्षेत्रापेक्षा संघटनात्मक साधनांचा विकास होणे गरजेचे आहे.

## प्र. ८ सहसंबंध स्पष्ट करा : *(प्रत्येकी ३ गुण)*

*** (१) जागतिकीकरण आणि संस्कृती.**

**उत्तर :** (१) जागतिकीकरण संस्कृतीचा वाहक आहे.

(२) समाजात व्यक्तिवाद व भौतिकवाद वाढला आहे.

(३) पारंपरिक मूल्यांपेक्षा आधुनिकीकरण व पाश्चिमात्यीकरण ही मूल्ये अधिक महत्त्वाची वाटू लागली आहेत.

(४) खानपानमध्ये बर्गर व पिझ्झासारख्या परकीय खाद्यपदार्थांना महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे.

*** (२) गॅट आणि जागतिक व्यापार संघटना.**

**उत्तर :** (१) दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक व्यापारात संतुलन प्रस्थापित करण्यासाठी General Agreement on Trade and Tariff हा करार करण्यात आला होता.

(२) या कराराची कार्यवाही करणारी कोणतीही यंत्रणा नव्हती.

(३) १९९५ साली World Trade Organization या संघटनेची स्थापना करून, आंतरराष्ट्रीय व्यापारावर नियंत्रण करणारी यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली.

(४) म्हणजेच WTO ची स्थापना ही GATT कराराचे पुढचे पाऊल आहे.

**(३) जागतिकीकरण आणि राष्ट्रीय अर्थव्यवस्था.**

**उत्तर :** (१) जागतिकीकरण ही एकात्मीकरणाची प्रक्रिया आहे.

(२) त्याअंतर्गत राष्ट्रीय अर्थव्यवस्था ही जागतिक अर्थव्यवस्थेशी संलग्न होणे अपेक्षित आहे.

(३) जागतिक अर्थव्यवस्थेचे एकत्रीकरण करण्यासाठी आर्थिक व्यवहारांवरील सर्व निर्बंध काढून टाकणे अपेक्षित असते.

(४) त्याअंतर्गत भांडवल, साधनसंपत्ती, मनुष्यबळ आणि तंत्रज्ञानाचा मुक्त संचार अपेक्षित असतो.

(५) आर्थिक, तांत्रिक आणि उत्पादन क्षेत्रांत परस्पर सहकार्य आणि परस्परावलंबन घडून येण्यासाठी खुल्या अर्थव्यवस्थेचा पुरस्कार करण्यात येतो.

**(४) भारतीय अर्थव्यवस्था आणि परदेशी गुंतवणूक.**

**उत्तर :** (१) आर्थिक विकासासाठी भारतीय अर्थव्यवस्थेत परदेशी गुंतवणूक जरुरी आहे.

(२) आर्थिक विकासासाठी ही गुंतवणूक रेल्वे, रस्ते, विमान वाहतूक इत्यादी संरचनात्मक साधनांमध्ये होण्याची गरज आहे.

(३) केवळ आर्थिक फायद्याकडे लक्ष देणाऱ्या विदेशी कंपन्या ग्राहकोपयोगी वस्तूंच्या उत्पादनात गुंतवणूक करतात.

**(५) भारतीय संस्कृती आणि प्रसारमाध्यमे.**

**उत्तर :** (१) जागतिकीकरणाच्या कालखंडात प्रसारमाध्यमांचा विस्तार झाला.

(२) पाश्चिमात्य उदार व आधुनिक विचारांबरोबरच भोगवादी मूल्यांचा प्रसार झाला.

(३) भारतीयांनी चुकीची पाश्चिमात्य मूल्ये स्वीकारून पारंपरिक मूल्यांना तिलांजली दिली.

(४) प्रसारमाध्यमांनी भारतीय पारंपरिक मूल्ये व संस्था कमकुवत व शिथिल करण्याची कामगिरी बजावली.

**प्र. ९ आपले मत (२५ ते ३० शब्दांत) नोंदवा : *(प्रत्येकी ४ गुण)***

*** (१) सहभागयुक्त (सहभागी) राज्य समाजासाठी हितकारक आहे.**

**उत्तर :** सहभागयुक्त (सहभागी) राज्य समाजासाठी हितकारक आहे, या विधानाशी मी सहमत आहे.

**कारणे :** (१) ही संकल्पना लोकशाहीशी सुसंगत आहे.

(२) सहभागाद्वारा नागरिकांच्या राजकीय जाणिवा अधिक प्रगल्भ होतील.

(३) राज्यकार्यांवर प्रजेचा–नागरिकांचा अंकुश प्रस्थापित होईल.

**(२) जागतिकीकरण ही राष्ट्रीय अर्थव्यवस्थेची जागतिक अर्थव्यवस्थेशी एकात्मतेची प्रक्रिया आहे.**

**उत्तर :** जागतिकीकरण ही राष्ट्रीय अर्थव्यवस्थेची जागतिक अर्थव्यवस्थेशी एकात्मतेची प्रक्रिया आहे, या विधानाशी मी सहमत आहे.

**कारणे :** (१) जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत राज्याराज्यांतील सीमारेषा पुसट होत चालल्या आहेत.

(२) आर्थिक, तांत्रिक आणि उत्पादन क्षेत्रांत परस्पर सहकार्य आणि परस्परावलंबन वाढत चालले आहे.

(३) जागतिक व्यापार संघटनेच्या पुढाकारामुळे आयात-निर्यातीवरील निर्बंध शिथिल होत चालले आहेत.

(४) माहिती तंत्रज्ञानाच्या प्रसारामुळे सांस्कृतिक सीमारेषा पुसल्या जात आहेत.

(५) त्यांतून जागतिक संस्कृती आणि मूल्ये विकसित होऊ लागली आहेत.

**(३) जागतिकीकरणामुळे ग्राहकांना दर्जेदार वस्तू व सेवा मिळतात.**

**उत्तर :** जागतिकीकरणामुळे ग्राहकांना दर्जेदार वस्तू व सेवा मिळतात, या विधानाशी मी सहमत आहे.

**कारणे :** (१) जागतिकीकरणानंतर संपूर्ण जग एक व्यापारपेठ बनली.

(२) वस्तू व सेवांच्या आयात-निर्यातीवरील निर्बंध दूर झाले.

(३) बहुराष्ट्रीय उद्योग व व्यापारसंस्थांचा विविध क्षेत्रात प्रवेश झाला.

**(४) जागतिकीकरण ही संकल्पना स्पष्ट करा.**

**उत्तर :** (१) 'जागतिकीकरण' म्हणजे देशाच्या भौगोलिक क्षेत्रापलीकडे उत्पादन आणि वितरण यांचा विकास व विस्तार होण्याची प्रक्रिया होय. याअंतर्गत भांडवल, वस्तू, उद्योजक, व्यावसायिक आणि मनुष्यबळ यांचा जगभर अनिर्बंध मुक्त संचार घडून येतो. राष्ट्रीय अर्थव्यवस्थेचे जागतिक अर्थव्यवस्थेत परिवर्तन होण्याची प्रक्रिया, म्हणजे 'जागतिकीकरण'.

(२) जागतिक नाणेनिधीच्या मते, "जगातील देशांचे आर्थिक परस्परावलंबन वाढणे म्हणजे जागतिकीकरण." त्यात समाविष्ट बाबी : (अ) वस्तू आणि सेवांच्या व्यवहारांच्या संख्येत व प्रकारांत वाढ. (ब) आंतरराष्ट्रीय भांडवल प्रवाहाचा विस्तार. (क) तंत्रज्ञानाचा जलद व व्यापक प्रसार.

(३) बहुराष्ट्रीय कंपन्या आणि माहिती तंत्रज्ञानातील प्रगती जागतिकीकरणाला पोषक ठरल्या. टीकाकारांच्या मते, जागतिकीकरणाच्या माध्यमातून बहुराष्ट्रीय कंपन्यांचे जागतिक अर्थव्यवस्थेवरील वाढते वर्चस्व हा 'नववसाहतवाद' आहे. त्यात विकसनशील देश आणि त्यांतील सहकारी चळवळींचा टिकाव लागणे कठीण आहे.

**(५) जागतिकीकरणाने भारतीय समाज व संस्कृती प्रभावित झाली आहे.**

**उत्तर :** (१) जागतिकीकरणामुळे भारतीय समाज व संस्कृती निश्चितच प्रभावित झाले आहेत.

(२) जागतिकीकरणामुळे परंपरानिष्ठ भारतीय समाजव्यवस्था प्रभावित झाली आहे. आधुनिकतेकडे वाटचाल करणाऱ्या या पारंपरिक समाजात संक्रमणावस्थेतील मूल्य-संघर्ष उद्‌भवत आहे.

(३) विभक्त कुटुंबपद्धतीपलीकडची अवस्था म्हणजेच, परदेशात स्थायिक झालेली मुले-मुली, सुना-नातवंडे आणि मायदेशी एकाकी जीवन जगणारे वृद्ध पालक. अशी परिस्थिती असंख्य मध्यमवर्गीय कुटुंबांत निर्माण झाली आहे.

(४) जातिव्यवस्थेची जागा वर्गव्यवस्था घेत आहे आणि प्रत्येक व्यक्तीचा दर्जा त्याच्या आर्थिक प्राप्ती आणि संपत्तीच्या आधारे निर्धारित होत आहे. स्त्री-पुरुष समानता ही बाब सार्वत्रिकरीत्या स्वीकारली जात आहे.

**(६) जागतिकीकरणाला नववसाहतवाद असे संबोधतात.**

**उत्तर :** जागतिकीकरण म्हणजे नववसाहतवाद या विचाराशी मी सहमत आहे; कारण–

(१) जागतिकीकरणामुळे जागतिक बाजारपेठा खुल्या झाल्या.

(२) अनियंत्रित स्पर्धेला ऊत येऊन लहान उद्योगधंद्यांचे अस्तित्व धोक्यात आले.

(३) बहुराष्ट्रीय कंपन्या अविकसित राष्ट्रांच्या नैसर्गिक संपत्तीचा अनिर्बंधरीत्या वापर करू लागल्या.

(४) अविकसित राष्ट्रांचे आर्थिक शोषण होऊन धनिक व गरीब देश अशी विषमतेची दरी निर्माण झाली. त्यामुळे जागतिकीकरण हे अविकसित देशांच्या दृष्टीने 'नववसाहतवाद' असे समीकरण झाले आहे.

**प्र. १० पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा : *(प्रत्येकी ५ गुण)***

***(१) जागतिकीकरणाच्या सकारात्मक व नकारात्मक बाजू कोणत्या आहेत?**

**उत्तर : (अ) सकारात्मक बाजू :**

(१) तरुणांसाठी आपल्या देशात आणि परदेशात नोकरी–व्यवसायाच्या नवीन संधी उपलब्ध होत आहेत.

(२) खासगी क्षेत्रात अधिक रोजगार निर्मिती होत आहे.

(३) आपण अधिक कार्यक्षम पद्धतीने जगाशी जोडले गेलो आहोत. जगात काय चालले आहे आणि त्याचा आपल्यावर काय परिणाम होईल याची अधिक चांगली जाणीव होते.

**(ब) नकारात्मक बाजू :**

(१) राज्याच्या कल्याणकारी योजना स्थगित होण्याची शक्यता आहे.

(२) स्थानिक उद्योगधंदे, विशेषतः लहान उद्योग हे जागतिक स्पर्धेमुळे नष्ट होतील, ही देखील भीती आहे.

(३) शेतीच्या क्षेत्रात लहान आणि किरकोळ शेतकरी मोठ्या कंपन्यांशी स्पर्धा करू शकणार नाहीत.

**(२) 'भांडवल गुंतवणुकीचा मुक्त संचार' हा जागतिकीकरणाचा आर्थिक पैलू स्पष्ट करा.**

**उत्तर :** (१) देशाच्या आर्थिक विकासात केवळ सरकारी पातळीवरच नव्हे तर खासगी क्षेत्रांतूनदेखील गुंतवणूक होत असते. टाटा किंवा रिलायन्ससारख्या खासगी कंपन्या भारतातच नव्हे तर अमेरिका, युरोप आणि आफ्रिका खंडातील राष्ट्रांतदेखील गुंतवणूक करतात.

(२) अनेक बहुराष्ट्रीय कंपन्या भारतात गुंतवणूक करीत आहेत. भारतात ही गुंतवणूक पायाभूत सुविधा, विमानतळ, आण्विक प्रकल्प इत्यादींमध्ये केली आहे.

(३) मॅक्डोनल्ड, बर्गर-किंग, पिझ्झाहट सारख्या कंपन्या ग्राहकोपयोगी क्षेत्रात गुंतवणूक करीत आहेत.

(४) १९९० च्या दशकापूर्वी अशा गुंतवणुकीचे प्रमाण कमी होते. १९९१ च्या नवीन आर्थिक धोरणात हे अडथळे आता दूर झाले आहेत. हा बदल म्हणजे भांडवली गुंतवणुकीचा मुक्त संचार आहे.

(५) विकसनशील राष्ट्र असलेल्या भारतात पायाभूत सुविधांमधील गुंतवणूक देशाच्या आर्थिक विकासासाठी आवश्यक आहे.

**(३) जागतिकीकरणानंतर व्यापार क्षेत्रात घडून आलेले बदल विशद करा.**

**उत्तर :** (१) जागतिकीकरणात मुक्त व्यापार अभिप्रेत आहे. १९९५ मध्ये जागतिक व्यापार संघटनेची स्थापना करण्यामागचा उद्देश मुक्त व्यापाराला प्रोत्साहन देण्याचा होता. त्यासाठी आयातीवरील सीमा शुल्क आणि इतर निर्बंध दूर करण्यासाठी जागतिक व्यापार संघटना प्रयत्नशील आहे. आंतरराष्ट्रीय व्यापारासंबंधीच्या नियमांचे सदस्य देशांकडून पालन व्हावे यासाठी ही संघटना प्रयत्नशील आहे. आंतरराष्ट्रीय व्यापारासंबंधीचे वाद ही संघटना सोडवते.

(२) १९९० च्या दशकात व्यापार या संकल्पनेला अधिक व्यापक स्वरूप दिले गेले. त्यात सेवा क्षेत्राची भर घातली गेली. म्हणजेच आता बँक, विमा यांसारख्या सेवादेखील व्यापाराचा भाग झाल्या आहेत.

(३) आज बौद्धिक संपदेचा व्यापार, म्हणजे कॉपीराईट, ट्रेडमार्क, पेटंट यांच्या देवाण-घेवाणीची चर्चा होत आहे.

(४) १९९० नंतर मालाची वाहतूक कंटेनर कार्गोंद्वारा केली जाते. ही जहाजे प्रचंड प्रमाणात मालाची वाहतूक करतात. अशा जहाजांसाठी खास बंदरांची व्यवस्था असते. कंटेनर कार्गोंच्या क्रांतीने आंतरराष्ट्रीय व्यापाराकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला आहे.

**(४) ट्रान्स-नॅशनल कंपनी म्हणजे काय?**

**ट्रान्स-नॅशनल कंपन्यांच्या उदयाचे सर्वसामान्य लोकांवर काय परिणाम झाले आहेत?**

**उत्तर : (अ) ट्रान्स-नॅशनल कंपनी :** ज्या खासगी कंपन्या देशांतर्गत कार्य करीत होत्या त्या आता परदेशी व्यापार करू लागल्या. त्यांचे रूपांतर बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये झाले. त्यांना ट्रान्स-नॅशनल कंपनी असे म्हणतात.

**(ब) सर्वसामान्य माणसावर परिणाम :**

(१) कुशल आणि अर्धकुशल कामगार आज पश्चिम आशिया, अमेरिका, युरोप इत्यादी ठिकाणी काम करीत आहेत. खासगी क्षेत्राच्या वाढीमुळे खानपान, मालवितरण, प्रवासी, वाहतूक इत्यादी सेवा क्षेत्रातील रोजगाराची संधी वाढली आहे.

(२) लहान उद्योगांना बड्या बहुराष्ट्रीय कंपन्यांशी स्पर्धा करावी लागते. जे उद्योग किंवा दुकाने कार्यक्षम पद्धतीने चालवली जातात ती त्या स्पर्धेत टिकून आहेत.

(३) शेतकरी आपला माल मोठ्या कंपन्यांना मध्यस्थांशिवाय थेट विकू शकतात. बहुराष्ट्रीय कंपन्यांनी नवीन तंत्रज्ञान आणले आहे. तसेच भारतीय मालाला नव्या बाजारपेठा खुल्या केल्या आहेत.

**(५) राज्याच्या सार्वभौमत्वाला असलेली आव्हाने सोदाहरण स्पष्ट करा.**

**उत्तर :** राज्याच्या सार्वभौमत्वाला देशांतर्गत घटक आणि आंतरराष्ट्रीय घटक यांच्यापासून आव्हान दिले जात आहे, हे पुढील उदाहरणांवरून स्पष्ट होईल :

NAVNEET

(१) भारत वेगवेगळ्या आंतरराष्ट्रीय करारांचा आणि संघटनांचा सभासद आहे. जागतिक व्यापार संघटनेचा सभासद म्हणून भारताला आंतरराष्ट्रीय व्यापाराबाबत काही नियमांचे पालन करावे लागते. पाकिस्तानबरोबर केलेल्या सिंधू नदीच्या पाणी वाटपाच्या करारामुळे तसेच बांगलादेशाशी केलेल्या फराक्का पाणी वाटप करारामुळे सिंधू आणि गंगा या नद्यांच्या पाणी वाटपाबाबत नियमांचे भारताला पालन करावे लागते.

(२) ॲमनेस्टी इंटरनॅशनल किंवा ग्रीन पीस यांसारख्या संघटना मानवी समस्यांबाबत प्रश्न उपस्थित करून स्थानिक सरकारांवर दबाव आणतात. काश्मीर संदर्भातील भारताच्या मानवी हक्कांच्या भूमिकेबाबत ॲमनेस्टीने टीका केली आहे.

(३) चेर्नोबिलच्या दुर्घटनेमुळे युरोपमध्ये रेडिएशन पसरले. या पर्यावरणासंदर्भातील आपत्तींना देशांच्या सीमेअंतर्गत ठेवता येत नाही. म्हणूनच युरोपियन राष्ट्रांना आपल्या जनतेला हानी पोहोचू नये म्हणून उपाययोजना करण्यासाठी एकमेकांना सहकार्य करावे लागते.

(४) मोठ्या धरणांबाबत विरोध करण्यासाठी नर्मदा बचाव आंदोलनाने जागतिक बँकेची मदत घेऊन हे आंदोलन आंतरराष्ट्रीय पातळीवर नेले.

(५) जैतापूर आणि कुडनकुलम येथील आण्विक प्रकल्पनांना विरोध केला जात आहे. या प्रकल्पांना योग्य त्या परवानग्या मिळूनही काही राजकीय पक्ष आणि NGOs त्यांना विरोध करीत आहेत.

**(६) तंत्रज्ञानातील बदलांचे विवरण करा.**

**उत्तर :** (१) १९९० च्या आधी दूरदर्शन हे भारतातील एकमेव दूरचित्रवाणी माध्यम होते. १९९० साली CNN या परदेशी वृत्तवाहिनीला प्रवेश दिल्यानंतर भारतात शेकडो देशी व विदेशी चॅनेल्स सुरू झाली आहेत.

(२) १९९१ पूर्वी टेलिफोनची उपलब्धता मर्यादित होती. आज मोबाइल फोन सार्वत्रिक झाले आहेत. सरकारी व खाजगी कंपन्या ही सेवा पुरवतात.

(३) इंटरनेट ही तंत्रज्ञानातील सर्वांत महत्त्वाची क्रांती आहे. जगात कोणाशीही कुठेही तात्काळ संपर्क साधण्याची सोय निर्माण झाली आहे. विचार, संस्कृती आणि माहितीचा प्रसार जगात कोठेही करणे यामुळे शक्य झाले आहे. इंटरनेटच्या 'सर्च इंजिन'च्या माध्यमातून आपल्याला माहिती गोळा करता येते. तसेच 'ट्विटर', 'स्काईप', 'फेसबुक', 'इन्स्टाग्राम', 'व्हॉटस् ॲप'च्या माध्यमातून सोशल 'नेटवर्किंग' ची सोय उपलब्ध झाली आहे.

(४) माहितीच्या युगातील तंत्रज्ञान हे साधारणतः आंतरराष्ट्रीय स्वरूपाचे असते. मोबाइल फोन, इंटरनेट, उपग्रहाद्वारे प्रक्षेपण हे कोणत्याही देशांच्या सीमांना बांधील नसते. यामुळेच सीमापार गट, संस्था आणि बिगर राजकीय घटक; गुन्हेगारी आणि दहशतवादी संघटनांच्या वाढीस मदत होते. अशा सीमापार गटांवर नियंत्रण ठेवणे किंवा त्यांच्या कार्यावर मर्यादा आणणे हे राज्यांना अवघड जाते.

**(७) जागतिकीकरणाचे सामाजिक व सांस्कृतिक प्रभाव स्पष्ट करा.**

**उत्तर :** (१) जागतिक पातळीवर प्रसारमाध्यमात झालेली क्रांती इंटरनेटच्या सेवेची उपलब्धता आणि लोकांचे देशांतर्गत आणि देशाबाहेरचे भ्रमण याचा समाज आणि संस्कृतीवर परिणाम झालेला दिसून येतो.

(२) आज आपल्याला 'वैश्विक कॉस्मॉपॉलिटन संस्कृतीचा' उदय होताना दिसत आहे. या वैश्विक कॉस्मॉपॉलिटन संस्कृतीवर पाश्चिमात्य विचारांचा बराच प्रभाव आहे. आधुनिकीकरण, पाश्चात्त्यीकरण, सेक्युलरायझेशन ही मूल्ये पारंपरिक मूल्यांपेक्षा महत्त्वाची वाटू लागली आहेत.

(३) लोकांच्या खाण्यापिण्याच्या सवयीमध्ये बर्गर, पिझ्झा, वडापाव इत्यादी फास्टफूडचे प्रमाण वाढलेले दिसते. 'वेस्टर्न' पद्धतीचे कपडे घालण्याचा कल वाढलेला दिसतो.

(४) नाताळ, दिवाळी यांसारखे सण साजरे करण्याच्या पद्धतीत पाश्चिमात्य प्रभाव दिसून येतो. 'मदर्स डे', 'फादर्स डे', 'फ्रेंडशिप डे' सारख्या नवीन कल्पना पुढे येतात.

(५) समाजात वाढत चाललेला व्यक्तिवाद आणि भौतिकवाद हा जागतिक संस्कृतीचा प्रभाव आहे. क्रेडिट कार्डमुळे आपल्या आवाक्याबाहेर खर्च करण्याची प्रवृत्ती दिसते. शहरीकरणामुळे पारंपरिक कुटुंब पद्धतीत बदल झाला आहे.

**प्र. ११ दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा : *(प्रत्येकी १० गुण)***

**• जागतिकीकरणाच्या प्रभावामुळे राजकीय क्षेत्रात घडून आलेले बदल पुढील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करा :**

**[मुद्दे : (अ) लोकशाहीचे महत्त्व (ब) राज्याचे स्थान (क) बिगर राजकीय घटक (ड) मानवी हक्क (ई) विचारप्रणाली.]**

**उत्तर :** जागतिकीकरणाने राजकीय क्षेत्रही प्रभावित झाले आहे. त्याचे विवरण पुढीलप्रमाणे आहे :

**(अ) लोकशाहीचे महत्त्व :** १९८९ ची पूर्व युरोपमधील क्रांती आणि सोव्हिएट रशियाचे विघटन या घटनांनंतर लोकशाही व्यवस्थेच्या दिशेने जग वाटचाल करीत आहे. 'सहभागी राज्य', 'नागरिक केंद्रित शासन' आणि 'सुशासन' या संकल्पना आता महत्त्वाच्या झाल्या आहेत. नागरिक केंद्रित शासन आणि सुशासन व्यवस्थेत नागरी समाजाच्या सहभागावर भर दिला जातो.

**(ब) राज्याचे स्थान :** जागतिकीकरणाच्या संदर्भात असे मानले जाते की, आता राज्याचे महत्त्व कमी होत चालले आहे. सार्वभौमत्व हा राज्याचा एक महत्त्वाचा घटक आहे. त्यावर आज आघात होत आहेत. आंतरराष्ट्रीय कायद्याचा विस्तार, प्रादेशिक आर्थिक संघटना, बाजारपेठेचे जागतिकीकरण, पर्यावरण आणि मानवी प्रश्नांबाबतची वाढती चिंता ही बाह्य आव्हाने आहेत. सहमतीचा अभाव, वांशिक

राष्ट्रवाद, बिगर राजकीय घटकांचा वाढता कार्यभाग, पर्यावरण, लिंगजन्य भेद आणि मानवतावादी समस्या ही अंतर्गत आव्हाने आहेत.

**(क) बिगर राजकीय घटक :** नागरी समाजाच्या वाढत्या महत्त्वामुळे स्वयंसेवी संघटना आणि बिगर सरकारी संस्थांना (Non-Government Organizations – NGO) महत्त्व प्राप्त झाले आहे. त्या संस्था मानवी समस्यांच्या प्रश्नांवर भर देतात. दहशतवादी संघटना या बिगर राजकीय घटकाला आज महत्त्व प्राप्त झाले आहे.

**(ड) मानवी हक्क :** जागतिकीकरणाच्या युगात मानवाधिकारांचे संरक्षण एक महत्त्वाचा विषय बनला आहे. भारतासारख्या विकसनशील देशात नागरी आणि राजकीय हक्कांच्या आधी आर्थिक विकास साधण्याची गरज असते. वैयक्तिक अधिकारांपेक्षा समाज-हिताचे महत्त्व अधिक आहे.

**(ई) विचारप्रणाली :** शीतयुद्धाच्या काळात विचारसरणी महत्त्वाची समजली जात असे. शीतयुद्धाच्या शेवटाबरोबरच साम्यवाद आणि विचारप्रणालीचा अंत (End of Ideology) झाला आहे, असे प्रतिपादन करण्यात येते.

**उपक्रम**

- ज्येष्ठ नागरिकांशी चर्चा करून जागतिकीकरणाच्या काळात झालेल्या बदलाची माहिती लिहा.

NAVNEET ®

## Based on the New Textbooks **STANDARD XII**

### Languages (Arts, Science, Commerce) :

1. English Yuvakbharati Digest (English Edition)
2. English Yuvakbharati Digest (मराठी आवृत्ती)
3. मराठी युवकभारती नवनीत
4. हिंदी युवकभारती नवनीत
5. Navneet English Yuvakbharati Grammar
6. English Writing Skills & Oral Test
7. नवनीत मराठी युवकभारती निबंध व लेखन
8. नवनीत मराठी युवकभारती व्याकरण
9. नवनीत हिंदी युवकभारती निबंध और लेखन

### Science :

1. **Physics** : (i) Physics Digest (Parts I & II) (ii) Handbook of Physics Practicals
2. **Chemistry** : (i) Chemistry Digest (Parts I & II)
   (ii) Handbook of Chemistry Practicals
   (iii) Navneet Organic Chemistry Reactions
   (iv) Navneet Physical Chemistry
3. **Biology** : (i) Biology Digest (Parts I & II) (ii) Handbook of Biology Practicals
4. **Mathematics & Statistics Digest, Part I** (For Science & Arts)
5. **Mathematics & Statistics Digest, Part II** (For Science & Arts)
6. Golden Book of Log Tables
7. Navneet Log Tables

### Arts & Commerce (English Medium) :

1. Economics Digest
2. Organisation of Commerce Digest
3. Secretarial Practice Digest
4. Book-keeping & Accountancy Digest
5. Mathematics & Statistics Digest, Part I (For Commerce)
6. Mathematics & Statistics Digest, Part II (For Commerce)

### कला आणि वाणिज्य (मराठी माध्यम) :

1. अर्थशास्त्र नवनीत
2. वाणिज्य संघटन व व्यवस्थापन नवनीत
3. चिटणिसाची कार्यपद्धती नवनीत
4. सहकार नवनीत
5. भूगोल नवनीत
6. इतिहास नवनीत
7. राज्यशास्त्र नवनीत
8. मानसशास्त्र नवनीत
9. समाजशास्त्र नवनीत
10. शिक्षणशास्त्र नवनीत

### Model Question Papers :

1. For Commerce
2. For Science

### Environment Education :

1. Navneet Environment Education – Projects & Assignments Book
2. नवनीत पर्यावरण शिक्षण – प्रकल्प व जर्नल

### Geography :

1. Geography Practical Examination Journal
2. भूगोल प्रात्यक्षिक परीक्षा जर्नल

**These books are available from all booksellers**

NAVNEET® NAVNEET EDUCATION LIMITED MW12e

Like us on /navneet.india | www.navneet.com

E0353